# नॉट आऊट

ग्रं. सं. ठाणे



REFBK-0005968

क्रिकेटपटु
डी. बी. देवधर

# ५० नॉट आऊट

( क्रिकेटपटु डी. बी. देवधर )

लेखक : गो. न. नातू

REFBK-0005968

प्रकाशक : का. अ. जोशी,

२३० सदाशिव, पुणें २.

प्रथमावृत्ति ] मूल्य १० आणे. [ डिसेंबर १९४०

प्रकाशक :
**का. अ. जोशी,**
२३० सदाशिव, पुणें २.

[ सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन ]

मुद्रक :
**अमृत केशवराव ढेरे,**
श्रीशिवाजी प्रिंटिंग वर्क्स,
४९५-९६ शनवार पेठ, पुणें २

रणजी ट्रॉफी ज्यांच्या 'कैद-
खान्यां'त आहे त्या या

१ देवधर ( कर्णधार )
२ भांडारकर
३ सोहोनी
४ भाजेकर
५ हजारे
६ गोखले
७ सरवटे
८ मोहोनी
९ उषाक अहमद
१० जाधव
११ पटवर्धन

व खंडेराव रांगणेकर (गेल्या वर्षी
'महाराष्ट्र टीम'मध्यें असलेले)
महाराष्ट्रीयांना
सादर समर्पण.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
मराठी ग्रंथ संग्रहालय

१. लहान मुलांचा अटीतटीचा सामना सुरू होता.

चवदा वर्षांचा एक ' बच्चा ' आपली बॅट परजीत सारख्या धांवा वाढवत होता.

सूर्य माथ्यावर आला तेव्हां त्यानें क्रीडांगणांत प्रवेश केला.

आणि.........

आणि 'मावळला रवि तरिही कच न आढळला' अशा संध्याकाळच्या वेळीं तो बाद झाला.

परंतु स्वतःच्या शंभर धांवा काढून आल्यावरच तो बाद झाला.

प्रेक्षकांपैकीं जे ' ठीक बुद्धी'चे होते ते ' उपरणें सांवरीत ' परस्परां-जवळ म्हणाले " हा मुलगा या खेळांत पुढेंमागें नांव मिळविल्याशिवाय राहावयाचा नाहीं. "

त्या दिवशीं रात्रीं 'आजी'नें एक गोष्ट सांगितली: 'एक होता राजा' अशी गोष्ट ऐकून अंगाई करतांना तो ' खेळाडू मुलगा ' मनाशीं म्हणत होता: "आपल्या शंभर धांवा झाल्या हें तर छान झालें, पण संघाला जय मिळाला यांतच खरा आनंद; नाहींतर त्या धांवा व्यर्थ होत्या."

त्या मुलाचें ' मन ' हें असें मोठें होतें.

आणि त्या मुलाचें ' मनगट ' !

" आज मॅच आहे आमची. आमच्याकडून तूं खेळशील का ? "
शाळेंतील एक सहाध्यायी ' बच्चा 'ला विचारीत होता.

“ खेळलों असतों रे. परंतु...”

“ परंतु वगैरे कांहीं नाहीं. तूं असल्याशिवाय आमच्या टीमला ‘ भोपळा ’ तरी फोडतां येईल काय ? शिवाय आज सुट्टीही आहे.”

“ सुट्टी असली तरी परीक्षा जवळ आल्या आहेत; आणि महत्त्वाचे सारे सामने संपून गेले आहेत. तुला नकार देतांना मला वाईट वाटतें. परंतु खेळाच्या वेळीं खेळ, आणि अभ्यासाच्या वेळीं अभ्यास, असें मला वाटतें. साऱ्या आयुष्याचा ‘ खेळ ’ होऊं देण्यांत अर्थ नाहीं.

“ शिष्ट आहेस.”

“ असेन बापडा ” बच्चा उद्गारला.

“ दिनू.”

“ काय मावशी ? ”

“ आज माझ्याजवळ शपथ घेतलीस तरच मी तुला खेळावयास जाऊं देईन ? ”

“ मावशी, कसली शपथ ?”

“ अरे दुसरी कसली शपथ, पुन्हां मी यष्टिरक्षण करणार नाहीं असें माझ्या पायांवर हात ठेवून सांग. नुकतेंच तुझें तोंडाचें दुखणें बरें झालें आहे. परवां नशीब तुझें आणि माझें, म्हणून चेंडूचा मार दांतांवरच बसला. जर डोळाबिळा मधें आला असता तर, ...नको ग बाई ती कल्पना ! बॅटीनें खेळ, चेंडूही फेंकत जा, पण माझी आज्ञा म्हणून विकेट-मागें उभा राहू नकोस.”

" मावशी, मी तुझ्या आज्ञेबाहेर नाहीं. "

" जा बरें, खुशाल जा मग खेळायला. "

आणि मावशीला त्या दिवशीं दिलेलें वचन त्यानें त्या वेळीं व त्यापुढें पाळलें नसतें तर......'

तर 'नवले' आणि 'हिंदळेकर' हीं नांवें 'चमकलीं' नसतींही कदाचित्.

" इकडचा सूर्य तिकडे उगवला " एक विद्यार्थी दुसऱ्या विद्यार्थ्याला विनोदानें म्हणाला.

" अरे असें झालें तरी काय ? गंधर्वानें मीमाचें काम केलें कीं गणपतराव जोशी 'भामिनी' झाले ?"

" तसें नाहीं रे बाबा. "

" मग ? "

" फर्ग्युसन कॉलेजनें मोठ्या सामन्यांत जय मिळविला ?"

" अशक्य...अगदीं अशक्य, यापेक्षां वाटेल ती दुसरी थाप मीं ऐकली असती. टिळकांना सरकारनें 'सी. आय.ई.' केल्याची बातमी तूं मला सांग, मी ती ऐकेन. परंतु हें कॉलेज जिंकेल !...आणि मोठा सामना...? गृहस्था, थापा मारतांना कांहीं इकडे तिकडे पाहत चल..."

ज्या काळांत हें वरील संभाषण चाललें होतें त्या काळांतील फर्ग्युसन कॉलेजची 'टीम' म्हणजे आपली 'टीम'च होती. त्यांत 'रंग' नव्हता....

" अरे मी तुला खरें तेंच सांगतों आहें. .........पण तूं ऐकून तर घ्यायला हवेंना ?"

" कोण, येवढें खेळलें तरी कोण ? "

" अरे, तो देवधर. यंदाच आला आहे कॉलेजमध्यें..."

"हां, मग बरोबर. हें तू मला पहिल्यांदा कां नाहीं सांगितलंस ? माफी मागतों हं."

" नुसती माफी नाहीं. माटेकराकडे 'टी पार्टी' झाली पाहिजे."

" देवधर आहेत कां घरांत ?"

" हो आहेत; कोण आहे ?"

" मी तारवाला."

खाकी पोषाखी तारवाल्यानें सायकल बाजूला टेकविली. आणि उदी रंगाच्या आडोशानें कानाच्या पाळ्यामागें खोंचलेली पेन्सिल देवधरांच्या हातांत देऊन त्यानें 'रिसीव्ह' ची सही घेतली.

'खाकी रंग' दूरवर निघून गेला.

" तार कसली आहे रे ?"

घरांतल्या कोणीतरी काळजीच्या स्वरांत विचारलें.

कारण, त्यावेळीं पत्र म्हणजे खुशाली, आणि तार म्हणजे मृत्यु अशीच सर्वसाधारणपणें कल्पना केली जात असे.

"मला मुंबईला चौरंगी सामन्यासाठीं बोलावलें आहे. त्याची तार आहे ही."

" घाई कर जा, कपडे नाहींत तुझ्याजवळ अजून. इथल्यासारखा धोतर नेसून नको हो तेथें खेळूं."

"छे. छे. तसा कसा खेळेन. वामनराव काळ्यांना विचारून येतों सारें. त्याना ठाऊक असेल सारें. ते मला कसें खेळावयाचें तेसुद्धा सांगतील."

पण.........?

" मिस्टर देवधर, वुइ आर व्हेरी सॉरी; यंदा तुमची निवड आम्ही करूं शकत नाहीं. "

"कांहीं हरकत नाहीं. त्यांत तुम्हांला वाईट वाटावयाचें कारण नाहीं."

" तसें नव्हे, तुम्ही येवढं पुण्याहून आलांत आणि........."

" तसें मुळींच नाहीं. मी किंवा ओघाडशंकर यांपैकीं कुणा तरी एकाला यंदा बसावेंच लागणार होते ना ? मग त्यांत मी राहिलों तर बिघडलं कुठें ?

" पुढच्या वर्षी नक्की. "

" थँक यू. "

" केम रे , ये छोटो नव्वो खेलाडू कोण छे ? बद्धो सारी रमत करीछे. "

" मोटो चतुर, पुण्यानो देवधर नामधारी खेलाडू छे. "

" शूअर स्ट्रोक दिखावें पडे. "

" स्टान्स वडरफुल. "

" नजर तो गरुड जेवी छे. "

" बॅट कितका स्ट्रेट ! "

" अरे एनो सूं करे, ग्लान्सनी रमत देख... "

" **वंडरफुल सेन्चरी वाय देवधर** " टाइम्सचें हेडिंग.

" **पुण्याचें नांव मुंबईंत गाजलें** " लोकमान्य.

" ही स्टँडस् देअर टू काँकर " ' सदानंद '

" टायरंट–दी टेरिबल बोलर ऑफ एम्. सी. सी. ट्राइड इन्व्हेन फॉर देवधर विकेट. "

" देवधर तुमच्या खेळाबद्दल तुम्हांस मीं काय द्यावें !" मानवदारचे महाराज म्हणाले.

" मी तसें कधीं घेत नाहीं कुणाजवळून; परंतु आपल्याला जर मला कांहीं द्यावयाचेंच असेल तर तें माझ्या कॉलेजला द्या. "

"आपण मोठ्या मनाचे खरे स्पोर्टस्मन आहांत. माझी दोन हजाराची देणगी जाहीर करा."

" थँक यू. "

रामजी त्यावेळीं फुल फॉर्ममधें होता.

जर्मनीच्या लांब पल्ल्याच्या हॉविट्झर तोफेंतून सुटणाऱ्या तेजोगोलाप्रमाणेंच विनाशक चेंडू तो टाकत होता.

साऱ्या चाळीस धांवा देऊन त्यानें ' रोषनआरा ' तर्फे खेळणाऱ्या दहा गड्यांचा नूर बदनूर करून टाकला.

परंतु...

तशाही प्रसंगीं त्या 'अकराव्या' अवतारानें रामजींचें ' बॉडिलॉइन ' पिंजाऱ्यानें कापूस पिंजून काढावा तसें मैदानाच्या कानाकोपऱ्यांत सही न सही पिंजून काढलें.

त्यावेळीं स्वतःच्या ८५ धांवा त्यांना अपुऱ्या वाटल्या असतील. पण प्रेक्षकांना तो पराक्रम 'न भूतो न भविष्यति' असा वाटला. कुणी म्हणाले......

"रामजीला मारावें देवधरांनींच."

"कुतुबमिनारके माफक एक दिन देवधर दुनियेमें मशहूर होंगे..."

पुण्याच्या देवधरांनीं त्यावेळीं वेगळ्या अर्थानें 'दिल्ली' लुटली. चांदणी चौकांतल्या व्यापाऱ्यांच्या श्रीमंत मुलांनीं त्यांचे 'फोटो' घेतले.

आणि 'आटोग्राफ' देतांना उजवा पंजा येवढा थकला असेल कीं, गांधीच्याप्रमाणें दोन्ही हातांनीं लिहावयाची संवय ठेविली असती तर बरें असें त्यांना वाटलें असेल.

आणि हा पराभव करून ते पुण्याला परत आल्यावर रसिक अंतःकरणांनीं, सागरकन्यांनीं हातांत हुर्मुजी मोत्यांचे सर घेऊन गगनाच्या कुतुबमिनारावर अनिश्चल उभ्या राहणाऱ्या 'कुमुदबांधवाला तारकांचीं लाखमोलाचीं निरांजनें घेऊन ओंवाळावें तसें त्यांना मनोमनीं 'आरतिलें' असेल.

८०४३
स्थळ प्रत
क्र.
ता.

पी. वाय. सी. वर बक्षीससमारंभ होता.

सेक्रेटरीनें यादी वाचतांना......

"टेनिस सिंगल्स चँपिअन. प्रो. डी. बी. देवधर..."

टाळ्यांचा कडकडाट झाला.

मोहोनींच्या कानाला लागून मीं विनोदानें म्हटलें:

" तात्यांनीं आतां पोलोंतच प्रतिष्ठा मिळवावयाची राहिली आहे. कारण ते टेनीस खेळतातच. क्रिकेटमध्यें त्यांची 'बॅट' प्रसिद्ध आहे. बिलियर्ड टेबलावर क्यू हातांत घेतला म्हणजे पंचवीस तिसाचा 'ब्रेक' ठरलेला. फुटबॉल तर त्यांच्या 'पदतलमलकवत्' आहे. आट्यापाट्या आणि खो खो खेळतांना मीं त्याना पाहिलेलें आहेच."

त्यावर मोहोनी हंसून म्हणाले "लांब धांवण्याच्या शर्यतींत त्यांनीं नांव दिलें असतें म्हणजे 'मॅराथॉन'चें बक्षीस पुण्यांतच राहिलें असतें."

पहिल्या सामन्यांत ते खेळले.

दुसऱ्या सामन्यांत ?

कोणीं आपली 'अक्कल' 'लक्ष्मी'ला विकली आणि त्यांना पुण्याला परत यावें लागलें.

जिमखान्यावरील बॉईजसुद्धां रडले. त्यांतले कांहीं देवधरांना वीस वर्षें ओळखत होते.

स्टेशनवर त्यांचें खेळाचें सामान आणून देणारे गडी परस्पर आले होते.

त्यांच्या डोळयांला पाणीसुद्धां आलें. आणि मग देवधरही गहिंवरून गेले.

आपल्याबद्दलचें प्रेम समाजाच्या या थरापर्यंत पोंचलेलें आहे याची त्यांना त्या दिवशीं ज़ाणीव झाली.

त्या गड्याच्या पाठीवरून त्यांनीं हात फिरविला. आणि ते डब्यांत चढले.

त्यांच्या चरित्राचें प्रस्तुत लेखकानें लिहिलेलें हें प्रास्ताविक जरी शेव-

स्थळ प्रत
सं.      सं.
ता.

टचें असलें तरी त्यांच्या कर्तृत्वाची खरी प्रस्तावनाही अजून पुरी झाली नाहीं. त्यांचें हें चरित्र वरच्या सूर्याचें खालच्या इवल्याशा माणसानें घेतलेलें सद्दर्शन होय. त्यांच्या सर्व विक्रमांचें वर्णन करावयासाठीं मला पुन्हां एकदा बसावें लागणार आहे. कारण, काल परवां ते जसें खेळले तसेंच अजूनही त्यांना अनेक ठिकाणीं खेळावयाचें आहे. त्यांची विजेसारखी फिरणारी बॅट अजून ब्रेबोर्न स्टेडियमवर तळपावयाची आहे.

२. क्रिकेटपटू देवधर यांचें चरित्र प्रसिद्ध करण्याची वेळ आज येऊन ठेपली आहे, याचें कारण असें कीं, त्यांच्या बॅटच्या पराक्रमाची सीमा आज परमावधीला पोंचली आहे. पौर्णिमेच्या राजसरागी अस्मानांत चांदण्यांची चमकदार चादर हंतरल्यावर खालीं दर्याचें पाणी गगनगामी अवसानानें हिंदळूं लागावें यांत नवल नाहीं. त्याप्रमाणें खऱ्या क्रिकेटप्रेमी माणसाचें मन आज या बुढ्या तात्याचा खेळ पाहून आनंदानें भरून आल्याखेरीज राहणार नाहीं. आज त्यानीं आपल्या पराक्रमानें असें सिद्ध करून दिलें आहे कीं, वयोमानानें तारुण्यवसंताची रेषा ओलांडली म्हणून कांहीं कोणी म्हातारे होत नाहींत. अरे, यांना म्हातारे कोण म्हणेल ! पुरातन काळीं द्रोण कांहीं म्हातारा नव्हता ! भीष्माला कोणीं म्हातारे म्हटलें नाहीं ! आणि आजकालचीं उदाहरणें द्यावयाचीं झालीं तर सरकारबरोबर सनदशीर रीतीनें भांडतां भांडतां हयातीचीं ८० वर्षं पाहिलेला पारशी दादाभाई, हा कांहीं म्हातारा नव्हता ! गांधी कांहीं म्हातारे नाहींत आणि देवधरही म्हातारे नाहींत. आणि तुम्ही जर यांना म्हातारे म्हणूं लागला तर अनंत काळ

यमुनेकांठीं खडा आहे म्हणून ताजमहाललाही म्हातारें म्हणावें लागेल. टागोर वृद्ध झाले म्हणून काय त्यांना म्हातारे म्हणावयाचें? ज्यांच्या बांकदार देहाची तिरकामटी गगनाला वेज पाडूं पाहणारे तीर सोडूं शकते ते म्हातारे कसे? तात्पर्य, जे जे टीकाकार वयोमानाचा वशिला घेऊन आमच्या चरित्र-नायकाकडे कांहीं काळ उण्यादुण्या दृष्टीनें पाहतात, त्यांना हें एवढें उत्तर पुरें आहे. पराक्रमाकडे दुर्लक्ष करून जर वयोमानाच्या गुणविशेषावर संघ निवडावयाचा व सामने द्यावयाचे असें ठरवलें तर मॉन्सफोर्ड, वुडफुल, हॉब्ज हीं नांवें आठ दहा वर्षांपूर्वीपासूनच आपल्या कानीं यावयाचें बंद झालें असतें. परंतु तें तसें नाहीं. जुन्यांना टाका व नव्यांना संधि द्या हें तत्त्व मलाही पटतें. पण केव्हां? या तत्त्वाचा योग्य उपयोग झाला असें मी केव्हां म्हणेन तर—एक तरुण व एक वृद्ध असे समान कर्तृत्वाचें खेळाडू सिलेक्शनकमिटीपुढें उभे आहेत व त्यांतून एक निवडावयाचा आहे. अशा वेळीं तरुण खेळाडूला आधीं संधि देणें हें अवश्यमेव ठरतें. परंतु ज्या खेळाडूच्या तुलनेला घेण्यासारखा खेळाडू सांपडणेंच मुष्किल, अशा एखाद्याला केवळ तो वृद्ध म्हणून मोठ्या सामन्यांतून बाद करणें ही गोष्ट अक्षम्य दुराग्रहाची आहे. असो.

माझी व देवधरांची प्रथम ओळख जरी थोड्या वर्षांपूर्वीं झाली असली तरी त्यांचें नांव मी शाळेंत जाऊं लागल्यापासून माझ्या कानांवर आणि मनांवर आहे. क्रिकेटचें मला थोडेंसें वेडच आहे. एखादा गानलुब्ध मनुष्य पुण्यांतील रामकृष्णबुवा वझे यांचेकडे ज्या आदरबुद्धीनें पाहतो, त्याच आदरबुद्धीनें माझ्यासारखा क्रिकेटप्रेमी देवधरांच्या व्यक्तित्वाकडे खेंचला जातो. एखादी मोठी झुंज संपल्यानंतर प्रेक्षकांपैकीं कांहीं मुग्ध झालेले रसिक एखाद्या विशिष्ट खेळाडूबरोबर मैदानाच्याच कडेशीं चर्चा करीत बसावें, तसाच थोडासा मीही चरित्र लिहावयास बसलों आहें. नुकताच चारआठ दिवसांपूर्वीं मुंबई आणि

महाराष्ट्र यांचा " या सम हा " असा झालेला सामना मीं पाहिला आहे. मन प्रसन्न झालेलें आहे, आणि आणखी आठ दहा दिवसांनीं होणाऱ्या मुंबई येथील पंचरंगी सामन्यांतील हिंदूंच्या यशाचें अज्ञात कुतूहल बुद्धीच्या तर्कपद्धतीला गुदगुल्या करीत आहे. अशा वेळीं वाटलें कीं, आज किती तरी दिवस मनांत घोळत असलेली देवधरांच्याबद्दलची आदरभावना पुस्तक रूपानें व्यक्त करावी. एक वर्षापूर्वी मीं त्या दृष्टीनें थोडासा प्रयत्नही केला होता. आज पुन्हां नव्यानें त्याला चालना मिळत आहे, आणि हें छोटेंसें पुस्तक लिहून झालें. लहान मुलांना डोळ्यांसमोर ठेवावयाला प्रो. देवधर आणि क्रिकेटियर देवधर या दोन स्वतंत्र व्यक्तित्वानें पूर्ण असलेल्या एका व्यक्तीचें चरित्र अत्यंत आवडतें होईल. माझ्या बालवाचकांपैकीं हजारांतून एक जरी भावी देवधर व्हावयाच्या प्रयत्नाला लागला तरीसुद्धां खर्च झालेल्या तनमनधनाचें चीज मला मिळेल.

३. क्रिकेट हा खेळ मूळचा इंग्लंडचा ! कोणास आश्चर्य वाटेल, परंतु येथें सांगावयास हरकत नाहीं कीं, इंग्लंड-अमेरिकेसारख्या व इतर युरोपीयन देशांतही हा खेळ खेळला जातो अशी जी बहुजनसमाजाची चुकीची समजूत दृढमूल होऊन बसली आहे, ती साफ चुकीची आहे. अमेरिका, इटाली, जपान, जर्मनी, व रशिया यांसारख्या देशांतून क्रिकेटमधील नांवें ऐकूं येत नाहींत याचें पुष्कळांना आश्चर्य वाटत असेल; पण याचें कारण इंग्लंडमधील लोकांचें या क्षेत्रांतील प्रभुत्व हें नसून ब्रिटिश साम्राज्याशिवाय इतर ठिकाणीं क्रिकेट खेळला जात नाहीं हें होय. कोणीं सांगावें हा खेळ अमेरिकेंत खेळला जात असता तर 'जो लुई'सारखे देवधर, नायडू, ब्रॅडमनही तेथें तयार झाले असते. तसें पाहिलें तर आंतरराष्ट्रीय खेळ म्हणजे, टेनिस, पोलो व हॉकी ! परंतु ब्रिटिश साम्राज्यांत क्रिकेटमुळें या खेळांचें फारसें नांव नाहीं.

४ देवधरांच्या क्रिकेटमधील खऱ्या पराक्रमास सुरवात फार वर्षांपूर्वी म्हणजे १९११ साली झाली. त्या साली त्यांनीं आपल्या बॅटिंगची परमावधि करून आपल्या कॉलेजला विजय संपादन करून दिला. त्या काळीं आजच्यासारखें क्रिकेटचें वेड बहुजनसमाजातील आबालवृद्धापर्यंत पोंचलें नव्हतें. आणि बाहेर औत्सुक्य नसल्यामुळें शाळेंतही मुलांना हा खेळ शिकविण्याची सोय आजच्याप्रमाणें केलेली नसे. अशा परिस्थितींत दिनूनें (आपल्या चरित्रनायकाचें संबंध नांव दिनकर बळवंत देवधर असें आहे) जें काहीं कौशल्य बालवयांत संपादन केलें तें स्वसंपादितच असणार. त्यावेळीं मुलांची क्रिकेटटीम तयार करावयाची याचा अर्थ आजकालची एक दोन आणे वर्गणी काढून खेळणारीं मुलें जशी रविवारच्या साध्या सामन्यासाठीं तयारी करतात, तितपतच असावयाची. एकाची बॅट, दुसऱ्याचा चेंडू, तिसऱ्याच्या स्टम्प्स् असला प्रकार त्यावेळीं असावयाचा ! सामन्याच्या आधीं मुलांना आठ दहा दिवस प्रॅक्टिस द्यावयाची. त्यांची कीर्ति मुंबईपर्यंत त्यावेळीं जाऊन पोंचली, आणि १९१२ सालीं कॉलेजातील त्याचा शिक्षणक्रम पूर्ण झाल्यानंतर मुंबई युनिव्हर्सिटीतर्फे मद्रास युनिव्हर्सिटीशीं जो सामना खेळण्यास संघ गेला, त्या संघात त्यांची निवड झाली. आणि याप्रसंगीं कोहिनूर हिऱ्याप्रमाणें आपल्या गुणाला अनेक पैलू आहेत, असें त्यांनीं सिद्ध करून दाखविलें. फिल्डिंगमधील आपलें कौशल्य तेथें सात झेल पकडून त्यांनीं सिद्ध केलें. क्रिकेटमध्यें कीर्ति संपादूं पाहणाऱ्या लहान मुलांनीं हें लक्षात ठेवावें कीं, देवधराप्रमाणें आपणास मोठें व्हावयाचें असेल, तर उत्तम बॅटिंगप्रमाणें उत्तम फिल्डिंग आणि सर्वसाधारण बोलिंगसुद्धा आपणांस करतां यावयास हवें. मुलांनो, तुम्ही देवधरांना अनेक ठिकाणीं खेळताना पाहिलें असेल, परंतु त्यांच्याहातून कधीं झेल सुटले, कधीं चेंडू अडवण्यात कामचुकार-

पणा झाला, असें आलेलें तुम्हांस आढळलें आहे का ? तुम्ही हे लक्षांत ठेवावें आणि प्रयत्नाला लागावें

त्याप्रमाणे हही माझ्या बालवाचकांना सागून टाकावेसें वाटतें कीं, देवधर हे संपूर्ण निर्व्यसनी आहेत. बॅटीनें पराक्रम केला म्हणून त्यानीं बीर जवळ केली नाहीं स्लिपवर उत्तम झेल झेलले म्हणून त्यांनीं सिगारेट तोंडात ठेवली नाहीं. हिंदुस्थानच्या क्रिकेटच्या इतिहासांत असा दुसरा आदर्श असलाच तर तो एखादाच ! म्हणून मुलांनो, मी तुम्हांला अभिमानानें सांगतो कीं, उत्तम क्रिकेटपटु व्हावयाला ब्लेझरचे कोट करावे लागत नाहींत, अमली पदार्थ सेवन करावे लागत नाहींत; शिक्षणाची आबाळ करावी लागत नाहीं. मद्रासमधील त्यांनीं १९१२ सालीं केलेला पराक्रम चौरंगी सामन्यातील हिंदुसंघाची निवड करणाऱ्या समितीच्या कानांवर गेला. आणि त्यांनीं त्याना तारेनें चौरंगी सामन्यांत खेळण्यासाठीं निमंत्रण केलें, त्यावेळीं या तरुण दिनूजवळ उत्तम ब्लेझर व उत्तम पाटलोण तर नव्हतीच, परंतु एका बॅटीशिवाय खेळास आवश्यक लागणाऱ्या गोष्टीसुद्धां त्यांच्याजवळ नव्हत्या. फर्ग्युसन कॉलेज-तर्फे नॉर्थकोट सामन्यांत खेळेपर्यंत ते बुटाशिवायच खेळत असत. परंतु सुदैवानें वेळेवर सर्व तयारी झाली आणि एकदम तिकडून आणलेल्या कपड्यांनिशीं देवधर मुंबईस गेले. परंतु पुढें नशिबानें निराळीच योजना करून ठेवली होती. त्याच्याऐवजी ओघाडशंकर या काठेवाडांतील तरुणास संधि मिळाली, आणि देवधर जसें गेले तसें हात हालवत परत आले. परंतु या प्रथमच झालेल्या दैवघातानें आपला चरित्रनायक निराश झाला नाहीं. दुसरा एकादा निराशावादी तरुण असता तर त्यानें या आशानिराशेमध्यें डोक्यांत राख घालून घेतली असती. तेरा हा आंकडा इंग्लंडमध्ये अशुभ समजला जातो. परंतु

देवधरांच्या बाबतींत मात्र तो शुभच ठरला. कारण, चौरंगी सामन्यांत त्यांचा प्रथम प्रवेश झाला तो १९१३ सालीं! याच वर्षीं अखेरच्या सामन्यामध्यें ६७ धांवा काढून त्यांनीं आपल्या प्रथम प्रवेशाला चांगली सुरवात केली. असो. आणि सर्वांत अभिनंदनीय गोष्ट म्हणजे प्रो. देवधरांचा निगर्वीपणा शतक काढून, मैदान गाजवून, आल्यानंतरसुद्धां शिकार मारून आलेल्या पराक्रमी सिंहाप्रमाणें अगदीं निगर्वी साधेसुधे, जणूं कांहींच झालें नाहीं आणि केलें नाहीं अशा परिवेषांत पी. वाय. सी. जिमखान्यावरील टेनिस् ग्राऊंडच्या शेजारीं असलेल्या लाल फुलांनीं फुललेल्या झाडाखालील बाकावर अभिनंदनार्थ आलेल्या–गेलेल्याबरोबर इतरांच्या सामान्य पराक्रमाची स्तुति करतांना दिसतील.

धबधबा गर्जना करतो आणि सिंधू नदी संथ वाहते म्हणून जलाशयाच्या बाबतींत धबधबा सिंधूची बरोबरी करील असें थोडेंच? वर्तमानपत्रांतील स्तुतिविषयक आलेल्या स्तंभामुळें सामान्य खेळाडूसुद्धां स्वतःला बॅटस्मन् समजून बडबडूं लागतो. दिग्गजावर टेकलेलें अनंत आकाश दुनियेला तक्तपोशीसारखें असूनसुद्धां कधीं पाऊसपाण्याचे बाबतींत बातचीत करावयाचा प्रसंग आल्याशिवाय आपल्या अस्तित्वाची जाणीव द्यावयास तोंड उघडत नाहीं. आणि त्यावेळींसुद्धां विद्युल्लतेसारख्या खेळकर कुमारीनें त्याला अनावर छेडलेलें असतें, तेव्हांच त्याच्या वीर वाणीला थोडी परिस्फुटता येते. रानडुकरानें दिलेल्या आव्हानाला उत्तर द्यावयाला सिंहाला आयाळाचे केंस ताठ करून कानन दुमदुमून सोडणाऱ्या गर्जनाच करावयास हव्यात असें नाहीं.

हा एवढा मोठा उपमा-दृष्टान्ताचा विस्तार एथें मांडण्याचें कारण म्हणजे अलीकडे 'आतां प्रो. देवधरांचा खेळ पूर्वींसारखा राहिला नाहीं' अशा तऱ्हेचे आक्षेप कांहीं मंडळीकडून घेतले जात होते. प्रो. देवधरांच्या

या पराक्रमांत या टीकाकारांना निदान २–४ वर्षे तरी तोंड उघडायला यायचें नाहीं. ईश्वरानें जिभेला हाड दिलें नाहीं याबद्दल खेदकारक विचार ज्या थोड्या सद्‌गृहस्थांकडे पाहून आपल्या मनांत येतात, त्यांपैकींच हे प्रो. देवधरांचे टीकाकार. देवधरांना फक्त क्रिकेटच खेळता येतें अशी लोकांची पक्की समजूत होऊन बसली आहे, हा लोकांचा भ्रम आहे. देवधर ज्याप्रमाणें क्रिकेट चांगला खेळतात तितक्याच कुशलतेनें ते दुसरेही खेळ खेळूं शकतात. कांहीं वर्षांपूर्वीं टेनिसच्या एकेरी सामन्यांत त्यांनीं आपलें प्राविण्य दाखवून लोकांचा भ्रम दूर केला, एवढेंच काय, पण सकाळीं टेनिस खेळूनसुद्धां दुपारीं ते क्रिकेट खेळतात. याशिवाय खोखो, आट्यापाट्या या खेळांतही त्यांनीं आपलें प्राविण्य दाखविलें आहे.

तारुण्याच्या मर्यादा ओलांडूनसुद्धां देवधर कां खेळूं शकतात? तर नियमित आहार, व्यसनरहित वागणूक, जाग्रणें टाळणें, हींच कारणें आहेत. त्यांच्याकडे पाहिलें तर पुरुषार्थाच्या जातिवंत पराक्रमाला सीमा आकाशाच्या असतात असें वाटतें. त्यांच्या व्यक्तित्वापासून लहान मुलांना, नवतरुणांना आणि वृद्धांना त्यांच्या चारित्र्यापासून कितीतरी गोष्टी शिकण्या-सारख्या आहेत. प्रत्येकानें तसा प्रयत्न करावा म्हणजे प्रत्येक मुलाला अमरनाथ होतां येईल. प्रारंभींच्या सामन्यांत अपयश आलेल्या तरुणांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, प्रो. देवधरांना हें यश मिळवण्यासाठीं भयंकर कष्ट पडले आहेत. एकाच गोळींत शिकार करीन म्हटलें, अगर, एका धोंड्यांत फळ पाडीन म्हटलें तर तें शक्य आहे का? आणि शिकार मिळाली नाहीं, अगर फळ पडलें नाहीं म्हणून फिरून प्रयत्न करायचा नाहीं का? त्याप्रमाणें आपलें कार्य अखंड चालूं ठेवावें. असें पुष्कळ खेळाडू सांपड-तील कीं ते उत्तम खेळाडू असूनसुद्धां त्यांच्या खाजगी चारित्र्याबद्दल लोकापवादाच्या कंड्या उठलेल्या असतात.

५. परंतु देवधर सर्व बाबतींतच श्रेष्ठ आहेत. त्यांच्या खेळाबद्दल कुणाचें दुमत असतें? ( आणि असा प्रकार जगांत चालावयाचाच ) तरी त्यांच्या स्वभावाबद्दल, त्यांच्या शालिनतेबद्दल कोणाचें दुमत होणार नाहीं. त्यांच्या-इतका वृद्ध खेळाडू एवढ्या तरुण स्फूर्तीनें कसा खेळतो ह्याचें आश्चर्य सर्वांनाच वाटतें. परंतु जगांत अशीं आश्चर्यें आपण पुष्कळ पाहतों ! आज राजकीय क्षितिजावर तळपळणारे अनेक तारे, पन्नास वर्षांच्या वयाची मर्यादा ओलांडून गेलेले आपण पाहतोंच आहों ना ! जर्मनीचा पालन-कर्ता शूर व मुत्सद्दी असा हिटलर पाहा ! पन्नाशी उलटल्यानंतरसुद्धां आज त्यानें केलेल्या अवाढव्य कामगिरीमुळेंच आज लहान पोरापासून थोरापर्यंत त्याचें नांव झालें आहे. देवधराचेंही तसेंच आहे. लहान मुलें क्रिकेटचा खेळ खेळत असतांना म्हणतात कीं नाहीं, " अरे, तो अगदीं देवधरासारखा खेळतोय. " देवधरांच्या खेळाकडे पॅव्हेलियनमध्यें असणाऱ्या प्रत्येक प्रेक्षकाचें लक्ष असतें. देवधर शाळेमध्यें असतांना खेळत होते ! कॉलेजमध्यें असतांना त्यांनीं आपली कर्तबगारी दाखविलीच. हल्लीं त्यांच्या नायकत्वामुळें कित्येक खेळाडूंना फायदा मिळतच आहे. मी खेळ पाहत बसलेलो असतांना एका मनुष्याचे उद्गार ऐकले, " मी ३० वर्षांपूर्वीं देवधरांना पाहिलें. ज्या तडफेनें देवधर हे ३० वर्षांपूर्वीं खेळले त्याच तडफेनें ते आज खेळत आहेत " आणि हें त्यांचें म्हणणें खरें नाहीं का ? त्यांच्या खेळाशीं तुलनेला घ्यावयाचे म्हणजे रायडर, हॉब्ज्-सारखे, शेलके लोकच घ्यावयास पाहिजेत. हॉब्ज्प्रमाणेंच ते वडीलधारे आहेत. आणि आठवण झाली म्हणून सांगतों, काहीं वर्षांपूर्वी हॉब्ज् ज्यावेळीं आपल्या टीमबरोबर येथें आले होते, त्यावेळीं त्यांनीं असें उद्गार काढले कीं, " आजपर्यंत मी पुष्कळ खेळाडू पाहिले पण देवधरा-सारखे खेळाडू देवधरच " दुसऱ्या कोणाचीही त्यास उपमा देतां येत

आ. क्र.



नाहीं. रत्न पारखण्यास रत्नपारखीच लागतो. लहानपणीं मी जेव्हां त्यांचा खेळ पाही तेव्हां माझी मति कुंठित होत असे. पण हल्लींचा खेळ पाहतां-नाही त्यांच्या खेळाला कोणत्या भव्य उपमा द्याव्यात, याबद्दल मन पुनः साशंकच होतें ! समोरचा गोलंदाज चेंडू कुशलतेनें टाकीत असतांना सागरासारख्या धीरगंभीर दिसणाऱ्या चित्तवृत्तीनें बिकट परिस्थितीत हा हिंदु संघाचा कर्णधार, बंदुकींतून सुटणाऱ्या गोळीप्रमाणें किंवा विद्युल्लतेप्रमाणें मारलेला फटका पाहून कोणाला बरें आनंद होणार नाहीं ! माझ्या आयुष्यांत दुःखाच्या आठवणीला जर कोणी विरंगुळा पाडूं शकत असेल, तर त्या क्रिकेटच्या खेळांच्या गोड आठवणीच.

आणि काळचक्राच्या अणिदार दात्यांत ज्यांचा विक्रम आहारीं पडला नाहीं असे देवधर, नायडू, अमरनाथ आणि अमरसिंग यांच्या दुःखहारी स्मृतींच्या उपकारांनीं बांधलेला मी त्यांना कसा विसरूं शकेन?

अमरसिंगाच्या मरणाची अकालीं कानांवर पडलेली बातमी ऐकून मला केवढा धक्का बसला ! हिंदूंचें केवढें नुकसान झालें आहे, आणि जागतिक क्रिकेटच्या खेळांत केवढें न्यून शिल्लक उरलें आहे !

असे अकालीं मृत्यु झालेले पाहिले म्हणजे माझ्या हृदयांतील हयात गुणवानाच्याबद्दल वाटणाऱ्या आदराला असीम ताण पडतो. वाटतें हे गुणी आज विक्रम करीत आहेत. परंतु उद्यां—

अज्ञाताच्या धूसर कुशींत आपला आर्द्र माथा दडवून बसलेल्या भविष्य-काळाचें 'उद्यां' हें एक अपत्य आहे.

आणि या 'उद्यां'त मृत्यूचें भय दडलें आहे. अगणित आशांना जन्म देणाऱ्या पराक्रमाची मुहूर्तमेढ रोंविली आहे हें आज कांहीं सांगतां येत नाहीं. खरोखर आपलें जीवन हें एखाद्या जुगाऱ्यासारखेंच नाहीं का ? जुगारी जसा फांसे टाकतांना पुढच्या क्षणाकडे आशायुक्त अंतःकरणानें पाहत

असतो तसेंच क्रीडाप्रेमी रसिक कित्येक वेळां जुन्या जमान्यांतील एखादा खेळाडू कालवश झाला म्हणजे...मनाला धीर देतांना म्हणतो, "कांहीं इरकत नाहीं, कालाचक्राला क्षमा मंजूर नसते तर नसूं दे! परंतु नवीन जवानांची तडफदार प्रगति तर तें थांबवूं शकणार नाहीं! मग काय हरकत आहे आशा करावयाला?" कित्येक वेळां या आशा सफळ होतात......परंतु ज्या वेळीं त्या होत नाहींत त्या वेळेला डोळयांपुढें भरून न आलेलें न्यून पाहून आपल्या हर्षाला खेदाचा उभा छेद दिला जातो. देवधर आज इतकीं वर्षें खेळत आहेत; म्हणून त्यांत खेद करण्यासारखें काय आहे? आणि ही कांहीं एक दुखःदायक घटना नाहीं. त्यांच्या बॅटींत प्रतिपक्षाच्या गोलंदाजींची छाती मोडण्याचें सामर्थ्य आहे, तोंपर्यंत कुठला टीकाकार तर्कशुद्ध पद्धतीनें या गोष्टीचा उच्चार व्याजोक्तीनें करूं शकेल? देवधरांच्या मनगटांत जोंपर्यंत सामर्थ्य आहे तोंपर्यंत हा खेळ खेळावा असें मी म्हणतों.

व्यक्तिशः त्यांच्यासंबंधीं बोलतांना कांहीं वर्षांपूर्वीं पुण्याला अमरसिंगानें माझ्याजवळ अत्यंत कौतुकपूर्ण उद्‌गार काढले होते. त्याच्या निवासस्थानीं जाऊन " पुण्यांतील प्रेक्षणीय स्थळें पाहावयास चलावयाचें आहे काय" असें त्याजबरोबरचे खेळाडू त्याला विचारत होते. त्याच दिवशीं तो बाहेरगांवाहून येथें सामना खेळावयास आला होता. त्यावर मनमोकळेपणें हंसून आपले आजानुबाहू वर उभारून मोकळेपणें तो त्या संवगड्यांना म्हणाला, "तुम्हांला जायचें तिथें जा. मी आज देवधरांचा मुंबई संघाबरोबर होणारा खेळ पाहावयास जाणार आहें. तात्या मोठा आहे, आणि सध्यां त्याचा खेळ दुर्मीळ झाला आहे; आणि शिवाय पुण्यांत आल्यावर त्याच्या खेळाशिवाय दुसरी प्रेक्षणीय स्थळें माझ्यासारख्या क्रिकेटपटूला कोठली असणार?" यावरून देवधर किती मोठे आहेत, हें कळतें आणि

अमरसिंगाच्याही मनाचा मोठेपणा केवळ हाताच्या मावेत मावण्याइतका आखूड नव्हता, हेंही कळतें. देवधरांच्या बाबतींत मर्चंट, नायडू, अमरनाथ या सर्वांचें एकच मत आहे, आणि तें म्हणजे देवधर यांच्यासारखा खेळाडू आज हिंदुस्थानांत नाहीं.

६. देवधर खेळतांना ज्या शांतपणानें खेळतात तो शांतपणा, ती वृत्ति खरोखरच आजकालच्या खेळाडूंत पाहूं जातां सांपडत नाहीं. ती शांत वृत्ति नायडूमध्यें असती तर काय झालें असतें? अमरनाथाचा खेळ पाहतांना ब्रेबोर्न स्टेडियम भान हरपून गेलेलें असतें. थोडेसे वांकलेले पाय त्यामध्यें ठेवलेली बॅटची मूठ, घारीप्रमाणें गोलंदाजाकडे वेधलेली दृष्टि, सूर्याचे सोनेरी किरण त्यांनीं पेहरलेल्या घडीदार फ्लॅनेलवर पडल्यामुळें परावर्तित होत आहेत. दुर्बिणीच्या कांचा जमवून त्याच्याकडे पाहत आहेत. मनाला समाधान वाटूं लागतें. आजच्या तरुण पिढीचा आदर्श म्हणजे अमरनाथ नव्हे का? परंतु तरीसुद्धां एखादे वेळेस मनाला वाटतें कीं, हा जलद गतीनें टाकलेल्या चेंडूला स्लिपमधून तीन तीन फील्डर्सच्या हातालगत उतावीळपणें चेंडू कट करूं लागला म्हणजे छाती धडधडूं लागते. बोर्डावर धांवांची संख्या सारखी वाढत असते. चार, दोन, तीन, पुन्हां चार, असे त्याचे फटके चालूं असतात. आणि अमरच्या फटक्यांत वैचित्र्य तरी केवढें असतें! ग्रहमालेंत बसलेल्या सप्तर्षींची प्रकाशाच्या बाबतींत साम्यता असली तरी प्रकाश सोडला म्हणजे त्यांचें व्यक्तिमत्व किती वेगळें असतें! तसें अमरच्या विविध फटक्यांचें. धांवत पळत जाऊन एक धांव घ्यावयाची म्हणजे त्याच्या हातचा मळ! निसारसारख्या तुफानी गोलंदाजाला लागोपाठ दोनदां सीमापार केल्यानंतर समोरच्या उभ्या असलेल्या विजयला तो खुणेनें सांगे, "आतां विकेटसमोर फटका मारून मी एक धांव घेणार आहें." आणि मग पुढच्या टाकलेल्या चेंडूवर निसारनें आपलें सारसर्वस्व मारलें

असलें, तरीसुद्धां लहान मुलानें लीलया हातांतला बेंदूल टाकावा तसाच तो चेंडू आला आहे, असें समजून अमरनाथ ती इच्छित एक धांव घेऊन दुसऱ्या टोंकाला जाई, परंतु हें सारें चालू असतांना मनाला राहून राहून एक प्रकारची दहशत वाटत असते, आणि याला कारण एकच! अमरनाथचा उतावीळपणा!

चित्त्याच्या चपळाईनें त्याचे पाय हालतात हें खरें! सागरसेतु ओलांडणाऱ्या जांबुवंताच्या हिरीरीनें तो चेंडूवर झडप घालतो हेंही खरें! परंतु आधींच अनिश्चित असलेल्या या क्रिकेटच्या खेळांत विकेट-जवळ असणाऱ्या अमरनाथाचें क्रिकेटचें आयुष्य तितकेंच अनिश्चित असतें. आणि ही चंचलतेंत मिसळलेली चंचलता बुद्धीला गफलतींत टाकीत असली तरीसुद्धां ताण केवढा देते! घोड्यावर पैसे लावणाऱ्या खेळाडूला अग्रेसर धांवणाऱ्या शेवटच्या दहा वास यार्डांवरून जाणाऱ्या तीनचार घोड्यांच्या श्रेणीकडून पाहतांना जसें वाटतें, तसें अमरनाथ, मुस्ताकअल्ली, अमरसिंग या तरुण खेळाडूंना विकेटपुढें पाहतांना आमच्यासारख्याला वाटतें. विजेला कधीं मेघाच्या अब्दागिरीखालीं तळपतांना आपल्या आयुष्याची धास्ती वाटली आहे कां? चंद्रबिंबाला खळी मारूं पाहणाऱ्या तुफान सागराला आपला उतावीळपणा पाहून कधीं उदास वाटलें आहे कां? दुनियेला दिवाणी म्हणणाऱ्या वेड्याला कधीं जगाची टीका झोंबली आहे कां? वायुलहरींवरून येणाऱ्या तल्यारखानच्या परिचित आवाजांतून, मुलांनो, हे शब्द तुमच्या कानांवर कितीदा तरी पडले असतील कीं, "If Amarsingh will play Cautiously,......if Naidu will play a careful game, then......" "Amarnath tried foolishly. This ball from Nissar was not an easy one." परंतु देवधरांच्याबद्दल तुम्हांला असें कधीं ऐकू आलें का?

७. देवधरांच्या खेळाकडे पाहिलें म्हणजे हिमालयापलीकडे असलेल्या द्रवरूप हिमांनीं आर्द्र झालेल्या संथ आणि खोल जलाशयाची आठवण झाल्यावांचून राहत नाहीं, अमरनाथाचें व्यक्तित्त्व हें दारूच्या बाणासारखें तेजस्वी, परंतु तसेंच क्षणभंगुरहि आहे. त्यांच्या खेळांत विजेची चपलता आहे; त्यानें मारलेल्या फटक्यांनीं चेंडू बंदुकींतून सुटलेल्या गोळीच्या वेगानें वाट चालूं लागतो. विकेटमध्यें लेग्कट् मारतांना त्याच्या पायाची तो जी मोहक हालचाल करतो ती पाहिली म्हणजे सिंहानें सावजावर झडप घालावयासाठीं किंचित् दिपून घेऊन पवित्रा टाकला आहे असें वाटतें. मेजर नायडूचा खेळ म्हणजे वादळी वाऱ्यासारखा झंजावाताची आठवण करून देणारा. परवां मुंबईला वादळ झालें तेव्हां हजारों मचवे, आणि शेंकडों गलबतें एखाद्या कागदाच्या पतंगासारखीं इतस्ततः विखुरलीं गेलीं. मीं तें दृश्य प्रत्यक्ष पाहिलें. तेव्हां एकाजवळ मीं विनोदानें म्हटलेंसुद्धां कीं, हें चोवीस तास टिकलेलें वादळ म्हणजे मेजरच्या खेळासारखें. विजेचा पंखा जोरानें फिरूं लागावा तशी मेजरची बॅट फिरूं लागते. आपले लांबसडक बाहू उंच उभारून भीमानें दुःशासनाची मांडी फोडतांना ज्या अवसानानें गदा खालीं आणली असेल त्या आवेशानें ते बॅट खालीं आणतात; आणि मग चेंडू परत खेळावयास गावला तर नशीब म्हणावयाचें. मागें युरोपियन् जिमखान्यावर मॅचेस् चालत त्या वेळेला बहुतेक प्रत्येक क्लबाच्या शामियानाच्या छतावर मेजरांच्या बॅटीनें मारलेले चेंडू आदळून गेलेले असावयाचे. कडेच्या रस्त्यावर असलेले रॅले ब्रदर्सच्या भव्य इमारतींतील तांदुळाच्या पोत्यांतसुद्धां या राक्षसानें मारलेला एखादा चेंडू दडून बसला असेल.

अमरसिंगचा खेळ मीं पाहिलेला आहे. प्राजक्ताच्या फुललेल्या झाडाचा बुंधा हालून खालीं नक्षत्रांसारखीं फुलांची रास पडलेली तुम्हीं पाहिली

आहे काय ? अगदीं तसा धांवांचा पाऊस तो पाडीत असे. दहा बारा वर्षांपूर्वी युरोपियन् टीमविरुद्ध खेळतांना जयच्या समवेत त्यांनीं चहाच्या वेळेपर्यंत दोनतीनशें धांवांचा खुर्दा करून दाखविला. आज दुर्दैवानें अमू जिवंत नाहीं. उद्यां पंचरंगी सामने सुरू झाले म्हणजे माझें मन किती गोंधळून जाईल ! काळानें काल परवां त्याला हिराहून नेलें, पण काळ हिरांवू शकला त्याच्या शरीराला ! मुंबईला, पुण्याला आणि दिल्लीला त्याच्या सान्निध्यांत जे कांहीं क्षण गेले त्या क्षणाभोंवतीं गुरफटून गेलेलीं स्मृतिचिन्हें माझ्या मृत्यूपर्यंत कृतांतालाहि पुसतां येणार नाहींत. परंतु एकपरीनें वाटतें, झालें तसें झालें नसतें, तर फार बरें झालें असतें. कारण, आज जीं त्या प्रेमळ स्मृतीचीं चिन्हें तप्त अग्निकंकणांनीं या हृदयावर कोरलीं गेलीं आहेत त्यांनीं शरिरांतील या नाजुकांतील नाजूक भागाचा कसा चोळामोळा होऊन जातो आहे ! अन् 'आतां पुन्हां कधीं दिसणार नाहीं ' असें मनाला वाटतांच ह्या ठिकाणीं त्याच्याविषयीं केलेला उल्लेख वस्तुतः देवधरांच्या गुणाला उठाव मिळावा म्हणून अमरमधले अवगुण दाखविण्यासाठीं मी करणार होतों, पण आतां करूं नये असें वाटूं लागतें. आतां वाटतें चंद्र अस्ताला गेल्यानंतर सूर्याचें वर्णन करावयाचें आहे, म्हणून त्याच्या अनंत प्रकाशित गुणांकडे दुर्लक्ष करून त्याचें कलंकित व्यंग उल्लेखिण्यांत काय स्वारस्य ? भारताच्या क्रिकेटच्या इतिहासांत अगदीं थोड्या अवधींत अमरनें आपल्यासाठीं बराच मजकूर लिहावा लागेल येवढीं पानें अडकवून टाकलीं आहेत. मला यापुढें अमू आठवेल तो त्याच्या उतावीळपणाच्या वृत्तीमुळें नव्हे; ज्या जगानें तो जिवंत असतां त्याच्या या अवगुणाकडे दुर्लक्ष केलें तें जग, काय त्याच्या मृत्यूनंतर स्वर्गांत देवेंद्राशीं सामने खेळावयास गेलेल्या अमूबद्दल वेडे-वांकडे उद्गार काढील ?

देवेंद्राच्या कल्पनेवरून सुचतें म्हणून सांगतों : स्वर्ग खरोखरच असेल, आणि मनुष्य मेल्यानंतर जर तेथेंच जात असेल, तर अमरसिंग तेथें गेल्यानंतर भगवान् श्रीकृष्ण आपला चेंडू-लगोऱ्याचा खेळ सोडून देईल. अमर आल्यानंतर तो त्याला म्हणेल " अमू, मी इतके दिवस तुझीच वाट पाहत होतों. फार दिवसांपूर्वी रणजितसिंग येथें आले आणि त्यांनीं मला उत्तम बॅटिंग शिकवलें, परंतु त्यांनीं शिकवलेलें सारें कसब मला प्रगट करावें लागेल अशी गोलंदाजी करणारा इथें कोणी नव्हता. बरें झालें तूं आलास." आणि मग—

आपापल्या परीनें वर वर्णित केलेले सारे खेळाडू स्वयंभू. या तिघांही खेळाडूंचा खेळ आणि विजय मर्चंटचा खेळ यांत जर कोणता महत्त्वाचा फरक असेल तर तो हाच कीं, विजयचा किंवा देवधरांचा खेळ हा प्रयत्नसाध्य आहे, परंतु अमरनाथ, नायडू आणि अमरसिंग ह्यांच्यासारखे बॅटीचे पराक्रम करतां यावयास विधिलिखितांत 'देणें देवाचें' असावें लागतें ! मोरोपंत आणि गडकरी यांत जो फरक तोच फरक देवधर आणि अमरनाथ यांत आहे. गडकऱ्यांची भरारी मोरोपंतांत नाहीं, आणि मोरोपंताचे शब्दभांडार आणि अलंकारनैपुण्य गडकऱ्यांजवळ नाहीं. मुलांना आदर्श म्हणून देवधरांखेरीज दुसरा खेळाडू नाहीं हें जें मीं यापूर्वी एकदां म्हटलें तें येवढ्यासाठींच. प्रयत्न करणें ही गोष्ट एकवेळ साध्य होईल; परंतु मुलांना जर पाठीशीं प्रभुकृपा किंवा ईश्वरदत्त देणगी नसेल तर अमरनाथ किंवा मुस्ताकअली यांच्या खेळांतील कौशल्य साध्य करतां यावयाचें नाहीं.

८. देवधरांचें आयुष्य म्हणजे चांगल्या अर्थानें स्टिव्हन्सन्च्या सुप्रसिद्ध जॅकेल आणि हाईडसारखें. इथें ही उपमा फक्त देवधरांच्या दुहेरी जीवनक्रमापुरतीच आहे. ह्याची तुम्हांला सत्यता पाहण्याकरतां तुम्ही माझ्याबरोबर पुण्याच्या त्या भव्य सर परशुरामभाऊ कॉलेजांत

चलता कां ? ते पाहा सायकलवरून उपरणें सावरीत, भिवयींपर्यंत ओढून बांधलेला फेटा व लांब पारशी फॅशनचा साधा कोट घालून जाणारी किरकोळ व्यक्ति बघा ! काय–काय म्हणतां, नाहीं ओळखत ?–अहो संतत धार धरणाऱ्या मेघाप्रमाणें क्रीडाक्षेत्रावर धांवा ओतणारे द्वितीय कप्तान देवधर ते हेच. आणि शिकवतात तरी कोणचा विषय ते इथें माहीत आहे ? पण नाक न मुरडतां ऐकाल ! तुमच्या संस्कृत पुस्तकांतील 'शक्लृपच्मुचि-रिच्वच्विच्' रूपी धातूंच्या झेंडूच्या माळांनीं नटलेली, काव्यसुंदरीचा महाल म्हणून मिरवणारी संस्कृत भाषा आठवतेना ?–हां–मग त्याच भाषेचे हे प्रोफेसर आहेत. काय म्हणतां, उत्सुकता आहे तुम्हांला त्यांचें व्याख्यान ऐकण्याची ?–मग चला त्या हॉलकडे. बघा बोटावर मोजण्याइतकीं पोरें, वरती पारव्यांचें घुमणें आणि टेबलाजवळ एखाद्या पाद्र्याच्या गंभीरतेनें व रूक्षतेनें इ. स. पूर्वीची एक संस्कृत कादंबरीची आवृत्ति घेऊन शिकवणारी ती आकृति–हेच ते आपले देवधर. आतां ते प्रोफेसरच्या म्हणजे शिक्षकाच्या अभिनिवेशांत आहेत. पण त्यांच्या आतांच्या ध्यानाकडे पाहिलें म्हणजे वाटतें कां तरी तुम्हांला कीं एखाद्या हिंडेनबुर्ग किंवा नेपोलिअनच्या मुत्सद्दी-पणानें क्रिकेट क्षेत्रावर खेळाडूंची योजना करून जयश्रीला अगदीं अलगद खेंचून आणणारे देवधर ते हेच !

हिरा कधीं सुगंधित सांपडत नाहीं. सुगंधी फूल सहसा छानदार असत नाहीं. चंदनाच्या खोडाला कधीं आकार नसतो आणि आभाळाच्या कडे-वर ढगांच्या कुतुबमिनाराचा आडोसा घेत घेत विविध रंगांनीं काया नट-वून पहुडलेल्या इंद्रकार्मुकाचा उपयोग प्रत्यंचेवर बाण लावावयासाठीं देवें-द्राला करतां येत नाहीं. कल्पनेनें कल्पनेला रंगवावें, तसें हे मोहक आभास आहेत ! परंतु जगत्संसाराकडे नजर टाकली म्हणजे व्यक्तीच्या परस्परविरोधी

अशा जीवनक्रमाचे कांहीं नमुने अपवादादाखल कां होईना आपणास पाहावयास मिळतातच कीं नाहीं !

जग जिंकावयास निघालेला नेपोलिअन तुम्हांस ठाऊक आहे. भूमि पददलित करावयासाठीं 'मार्शल ने'ला ज्यानें ब्लूचरच्या लक्षावधि शत्रुसैनिकांना रणांगणावर कंठस्नान घालावयास हुकूम दिला तो कठोर-हृदयी नेपोलिअन आपल्या खाजगी शामियानांत जोसेफाईनचें पत्र वेळेवर न आल्यामुळें अश्रु ढाळत बसला होता. एका धनिकानें दिलेले आव्हान स्वीकारून आपल्या दुमडलेल्या आणि उलगडलेल्या लाटांनीं क्षणांत अरत्रीची आणि क्षणांत परत्रीची वास्तपूस्त करणाऱ्या ॲटलॅंटिकला एका जुजबी विमानांत बसून पालाण घालणारा साहसी लिंडबर्ग मनाचा किती धीरगंभीर असला पाहिजे असें तुम्ही म्हणाल ! परंतु कांहीं वर्षांपूर्वी त्याचा लहान मुलगा ब्रूनो हॉफटमन् या बदमाषानें पळवून नेला त्या वेळीं त्यानें केवढा केविलवाणा प्रकट हंबरडा फोडला ! आणि आपल्या मराठ्यांच्या इतिहासांतलें संभाजीचें चरित्रदेखील या विरोधाभासात्मक दुहेरी जीवनाचा एक उत्तम मासला नव्हे का ? तुळशींत भांग निपजावी त्याप्रमाणें शिवाजी महाराजांच्या पोटीं जन्माला आलेला आणि व्यसनांत गुरफटलेला नवजवान संभाजी आणि भांगेंत तुळस असावी त्याप्रमाणें त्याच्या व्यसनी जीवनांत त्याच्या अन्त्यसमयीं फळाला आलेल्या महाराष्ट्राला अविस्मरणीय वाटणारा चमकदार करारीपणा हे दोन्हीहि हृद्य भाव किती वेगवेगळ्या स्वरूपाचे आहेत ! बराच वेळ परिचयांत गेला असल्याखेरीज देवधरांना कॉलेजांत पाहिलेला कुठलाहि मुलगा क्रीडांगणावर ओळखूं शकणार नाहीं. सकाळीं महाभारत शिकवून बाहेर पडलेले देवधर दुपारीं महमद निसारचे बोलिंग तितक्याच सहजतेनें चोपूं शकतात ही गोष्ट क्रिकेटच्या खेळांत प्राविण्य मिळविण्याच्या हेतुसिद्धीसाठीं

अभ्यासाकडे टंगळमंगळ करणाऱ्या माझ्या तरुण क्रिकेटप्रेमी वाचकांनीं लक्षांत ठेवावी !

९. कादंबरीकाराप्रमाणेंच खेळाडूलासुद्धां संघाच्या दृष्टीनें जगाकडे पाहावें लागतें. या वाक्याचा संदिग्ध अर्थ जास्त स्पष्ट करून सांगावयाचा म्हणजे एखादा संघ ज्या वेळेला मैदानांत उतरतो त्यावेळेला त्यांतील प्रत्येक खेळाडू हा जरी आपल्या परीनें स्वतंत्र असतो तरीसुद्धां त्याची दृष्टि आणि कार्य मात्र संघाच्या पद्धतीचेंच असतें. फुलें वेगवेगळीं मोजतां येत असलीं तरी गुच्छांत त्यांची गुंफण केल्यानंतर जगापुढें मालाकारानें ज्या स्वरूपांत त्यांना ठेविलें असतें त्याच स्वरूपांत त्यांना आपले गुण प्रगट करावे लागतात.

हें एवढें पुराणकथन करावयाचें कारण असें कीं, कांहीं खेळाडू संघातर्फे खेळतांना ही गोष्ट अजिबात विसरून जातात. पृथ्वी स्वतःच्या कल्पित मध्यबिंदूभोंवतीं फिरत असते आणि तशी ती भोंवऱ्यासारखी फिरत असतानांच सूर्याच्या भव्य तेजोवलयांकित बिंबाभोंवतीं प्रदक्षिणा घालीत असते. जर एखादे वेळीं जगद्सूत्रधारानें आंखून दिलेल्या कार्यक्रमा-विरुद्ध ती धात्री स्वतःभोंवतीं पिंगा घालीत असतांना रविप्रदक्षिणेसाठीं जो प्रतिपद आंखला जातो, त्यावरील आपलीं पावलें गतिमान करणार नाहीं तर केवढा महान् अनर्थ ती निर्माण करील ! त्या स्थिरतेमुळें ती स्वतःचा तर नाश करीलच, पण आपल्याबरोबर दुसऱ्या एखाद्या 'गोला'लाही ती बहिर्गोल करून टाकील. जी गोष्ट मेदिनीची तीच गोष्ट खेळाडूची. आणि म्हणूनच संघांतील अकरा खेळाडूंनीं खेळीमेळीनें वागावयास हवें.

परंतु ही गोष्ट किती क्रीडापटु आचरणांत आणतांना दिसतात ? मुलांनो, तुमच्या कानांवर आजवर या गोष्टी आल्या नसतील. आणि त्या आल्या नाहींत हेंच फार बरें. कारण, हिंदुस्थानांतील क्रिकेटखेळांतील सुप्रसिद्ध खेळाडूंचें आपापसामधील वैर तुम्हांस ठाऊक असतें तर तुम्ही ज्या निरागस

आणि निर्मळ मनानें चौरंगी–पंचरंगी, सर्व हिंदुस्थान, असे होणारे सामने पाहून वा त्यांचीं वर्णनें ऐकून आनंद लुटूं शकतां तो आनंद तुमच्या आयुष्यांतील कायमचा बाद झाला असता. आणि म्हणून सांगतों, मुलांनो, या दुहींची कल्पना तुम्हांला नाहीं तेंच फार बरें आहे. फुलांचा वास तुम्ही घेत आलांत आणि पुढें घेत जाणार.

जगामध्यें पुष्कळ सौंदर्यस्थळें अशीं आहेत कीं, तीं सुंदर आहेत हें जरी खरें, तरी त्यांचा प्रत्यक्ष व्यवहारांत कांहींच उपयोग नसतो. ताज-महाल सुंदर नाहीं असें कोण म्हणेल, दृष्टि असलेली दोन आंखवाली दुनिया तर त्याचें कौतुक करीलच, पण आंख नसलेला अंधळासुद्धां हातानें त्या यमुनेच्या काठांवर आपली नभाला दुथड देणारी मिनारमाला सांभाळत स्वर्गाला नभगर्व करणाऱ्या शहाजहाननें बांधलेल्या प्रीतिमंदि-राच्या संगमरवराला चांचपून पाहिलें तर तोसुद्धां आश्चर्यानें उद्गारेल, 'वाहवा ! इनशान अल्ला'. परंतु हें जरी खरें असलें तरी तें स्थान कांहीं राहावयास योग्य नाहीं. घटका दोन घटका वसती करण्याच्या मुलायम परिवेषांत त्याचा अलौकिक दिमाख पाहावयाचा आणि हृदयानें कधीं न विसरणारे त्याचें सुंदर रेखाचित्र काढून घेतलें कीं तेथून मार्गस्थ व्हावयाचें. व्यवहारी बुद्धीला उलट असें वाटेल कीं, या 'सौंदर्यस्थानां'त राहतां येत नाहीं तर त्याचा आजकालच्या जीवनकलहांत उपयोग काय ? त्यापेक्षां लालबागेंतील जुनी चाळ बरी. किंवा पुण्याच्या सदाशिव पेठेंतील "दहा बाय दहा"च्या खोल्या–नव्हे ब्लॉक, बरें.

हे विचारच नव्हेत बरं ! ही साधी विचारपरंपराच मुळीं अविचारी आहे. मार्क्सनें जें तत्त्वज्ञान सांगितलें–तें ज्या कारणाच्या निर्मूलनासाठीं सांगितलें, आणि ज्यासाठीं त्यांनीं हातांतील 'हातोडा' उगारला तें कारण कुठलें असेल तें असो. पण तें 'हें' मात्र खास नव्हे. फुलें रशियांतही निर्माण

होतात; कुणाची जर अशी कल्पना असेल कीं, लेनिनग्राडमध्यें फुलांची दुकानेंच नाहींत, तर ती चुकीची ठरेल. 'खेळां'चा उपयोग व्यवहारांत काय? असले कारकुनी डोक्यांतून त्याच्याच मुलांबाळांना विचारले जाणारे प्रश्न आपल्या कानीं नित्यशः पडतात. बिचाऱ्यांना काय उत्तर द्यावयाचें? त्याच्या या असल्या वृत्तीमुळेंच अनेक कलाप्रांतांत हिंदुस्थान मागें राहिला आहे. कलेला उत्तेजन द्यावयाला आपल्याकडील जे राजे-महाराजे त्यांना जर फुरसत नाहीं तर ती इतर सामान्य जनांना कुठून असणार?

नशीब भारताचें कीं शहाजहानला या "प्रॅक्टिकल" बुद्धीनें स्पर्श केला नाहीं. नशीब रवींद्रनाथांचें कीं त्यांनाहीं 'गीताञ्जली' लिहितांना एखादा 'प्रॅक्टिकल' मनुष्य येऊन भेटला नाहीं.

मला 'देव' प्रसन्न झाला आणि एखादा 'वर' मागून घे असें जर तो अस्मादिकाला म्हणाला तर मी हाच वर मागेन कीं, "हे भगवन् मला स्वतःसाठीं कांहीं नको. पण जगांतील हे 'प्रॅक्टिकल' विचारांचे चिंतातुर जंतु सारे नाहींसे करून टाक, किंवा त्यांच्यांत विचारपालट तरी करून टाक!"

कलेचा प्रांत मोठा आहे. क्रिकेटचा खेळ हासुद्धां कलेंतच सामावलेला आहे. 'आधीं जीवन कां आधीं कला' या प्रश्नावर महाराष्ट्रांत हल्लीं वाद-विवाद चालू आहेत. आपल्याला त्या वादांत कांहीं शिरावयाचें कारण नाहीं. परंतु येवढें मात्र येथें सांगूं शकतों कीं असल्या तऱ्हेच्या चर्चा चर्चिल्या जाऊन कुठल्याही वादाचा निकाल लागावयाचा नाहीं.

आपण देवधरांच्याच चरित्राकडे नजर टाका म्हणजे आपल्या लक्षांत येईल कीं, कला आणि जीवन या दोन गोष्टींची सरमेसळ ह्यांनीं आपल्या आयुष्यांत कधींच केली नाहीं. अमरनाथाप्रमाणें खेळासाठीं त्यांनीं आपलें शैक्षणिक आयुष्य सोडलें नाहीं. किंवा सी. एस्. प्रमाणें ते धंदेवाईक खेळाडू बनले नाहींत. मुलांनो, तसेंच तुम्ही व्हा.

[library stamp]

१०. पहिल्या चौरंगी सामन्यांत प्रवेश झाल्याबरोबर देवधरांना अमरनाथा-सारखे महान् यश मिळालें असें मात्र नाहीं. त्या प्रथम खेळलेल्या चौरंगी सामन्यांत त्यांच्या जास्तींत जास्त वैयक्तिक धांवा ६७ झाल्या. या धांवा जरी 'असंख्य' नसल्या तरी 'अल्प'ही नव्हेत अशा आहेत. यापुढें प्रत्येक वेळीं ते जे जे सामने खेळले त्या त्या सामन्यांत कुठल्या तरी एका डावामध्यें त्यांचा खेळ कौतुकास्पद होत असे. शतकें लागणें हें क्रिकेटच्या खेळांतलें एक उच्च परिमाण आहे. आपल्या चरित्रनायकाच्या वांट्याला मोठ्या सामन्यांतील पहिलें शतक १९२५ सालीं प्रथम मिळालें. म्हणजे त्यांचा प्रयत्नवाद केवढा दांडगा होता पाहा. खेळूं लागल्यापासून जवळ जवळ बारा तेरा वर्षांनीं या यशाचें ते धनी झाले.

आजच्या रसिकांनीं आणि आजच्या खेळाडूंनींही विचार करावा अशी ही गोष्ट नव्हे का? आजच्या रसिक प्रेक्षकांच्या अपेक्षा एवढ्या वाढीला गेल्या आहेत कीं, मोठ्या सामन्यांत नवीन प्रवेश केलेल्या एखाद्या तरुण खेळाडूनें दोन चार वर्षांच्या अवधींत जर शतक काढावयाचा मान मिळविला नाहीं तर तो कुचकामाचा. या त्यांच्या वृत्तीमुळें सिलेक्शन बोर्डावर नेमलेल्या माणसांवरसुद्धां परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं.

एक दोन वर्षें खेळायला घेऊन तेज पडलें नाहीं म्हणून ज्यांना साम-न्यांतून हद्दपार केल्यासारखें केलें आहे असे कित्येक खेळाडू आपल्यासमोर आज दिसतात. नवमल, चंपक मेथा, इ. या ठिकाणीं ही नांवांची यादी मी वाढवीत नाहीं.

खेळाडूंनीं या देवधरांच्या अनुभवावरून हें लक्षांत ठेवावें कीं, एक दोन वर्षांत आपण यशाचें धनी झालों नाहीं म्हणून त्यांनीं धीर सोडावयाचें कारण नाहीं. व शेवटीं यश मिळविलें यावरून हेंच सिद्ध होत नाहीं काय?

११. आज १९४० साल बाद होण्यासाठीं डिसेंबरच्या मध्य रेषेवर येऊन उभें आहे. आज त्यांचें चरित्र पाठीमागें वळून न्याहाळलें तर शतकांचे शताधिक विक्रम संपादिलेले दिसतील. जे चौरंगी सामने ते खेळले त्यांतीलच त्यांनीं काढलेल्या वैयक्तिक धांवांचा आंकडा पंधराशेंच्या वर गेलेला आहे. त्यांच्याएवढ्या धांवा काढणारे दुसरे खेळाडू म्हणजे नायडूच. परंतु हे सामने सोडले तर या दोघांमध्यें समांतर असा गुण क्रीडाक्षेत्रांत दुसरा कोठलाच दृष्टीस पडत नाहीं. देवधरांची वर सांगितलेली धांवांची संख्या जी त्यांनीं जमा केली ती "थेंबें थेंबें तळें साचें" यासारखी. ऑफिसमध्यें जुन्या काळीं लागलेल्या एखाद्या मामाजींनीं पै दोन पै शिल्लक टाकून शेवटीं पेन्शनींत निघतांना गांवाबाहेर एखादा छोटा बंगला बांधावा तसें त्यांचें. याउलट मेजर नायडूंची वस्तुस्थिति आहे. एखाद्या पंटरनें बरोबर डोकें चालवून पांच रुपयांच्या नोटेवर तीस चाळीस हजारांचा ट्रेबल पूल फ्ल्यूक घोड्यावर मिळवावा तसें पांच दहा इनिंगजमध्यें आपल्या बॅटीनें तो धांवा जमा करतो. आणि पुढें ही उपमा घेऊन बोलावयाचें तर देवधरांचा खेळ म्हणजे फेव्हरिट घोड्यावर पैसे लावून दहा रुपयांचे बारा रुपये घेण्यासारखें आहे. ज्या कांहीं थोड्या अनभिज्ञ प्रेक्षकांना देवधरांचा खेळ पाहतांना रंग न भरल्यासारखें वाटतें, त्याचें कारण तर हेंच कीं, त्यांनीं स्वतःच्या बाबतींत या खेळांतील अनिश्चितता काढून टाकली आहे. आणि निश्चितता ही व्यवहारांत कितीही फायदेशीर होत असली तरी गॅलरींत हल्लींही प्रेक्षकांना आपल्या चारित्रनायकाच्या सुंदर पण धिम्या बॅटीनें मारलेल्या ग्लान्सच्या फटक्यापेक्षां हवेवाल्यानें अनाकर्षक रीतीनें मारलेले फटकेच जास्त प्रिय असतात. याच कारणाकरितां अमरसिंग येवढ्या थोड्या वेळांत आबालवृद्धांचा आवडता होऊन बसला होता.

तसें पाहिलें तर जगाला अपूर्णाचीच पूजा करण्यांत प्रेम वाटतें. पूर्ण फुल-

लेल्या फुलापेक्षां सुकुमार कळी रमणी आपल्या अलकसंपदेंत स्थापित करते. बादलीभर पाण्याचा उपयोग करून जीवन जगवण्यापेक्षां, तृषार्त नवजवानाला मृगजळाचा पाठलाग करतां करतां, वाळुकणानें तापलेल्या वाळवंटांतून सैरावैरा धांवत जातांना छाती फुटून खोट्या रंगसंगतीनें निर्माण झालेल्या जलाभासाकडे पाहात पाहात, डोळ्यांची टक अस्मानाकडे लावीत मरण पत्करणें बरें वाटतें. गुलकंदाचा कारखाना काढून श्रीमंत होण्यापेक्षां, खरा रसिक फुलें विकून गरीबी पत्करील. आज वित्तासाठीं विश्व वेडें झालें आहे हें खरें, परंतु आज पिढ्यान्‌पिढ्या परंपरेनें मनांत रुजलेल्या मल्या—वेड्या बुद्धीला त्यानें कांहीं फांसावर लटकाविलें नाहीं, व म्हणूनच मुलांना मोठ्या सामन्याचा दिवस उजाडला म्हणजे शाळेला सुट्टी मिळो कीं न मिळो त्यांचीं पावलें मैदानाकडे वळतात. कोणत्याही कलेचा आनंद लुटावयास ज्यानें आपलें मन सदैव तयार ठेवलें आहे, त्याला थोडेंसें वेडेंच व्हावयास हवें. मुलांनो, मी जरी थोडासा मोठा झालों असलों, तरी या खेळाच्या बाबतींत मीही तुमच्यासारखाच अधीर बुद्धीचा आहे. पंचरंगी सामन्याचे दिवस जवळ आले म्हणजे केवढी गोड हुरहुर माझ्या मनाला लागून राहते. प्रणयविह्वल विरहाकुल तरुणसुद्धां आपल्या सखीमीलनाच्या आगामी निश्चित क्षणाकडे डोळे लावून बसत नसेल ! आणि तो दिवस उजाडला म्हणजे मित्रांबरोबर सकाळीं पूना मेलमध्यें बसतांना एवढा आनंद माझ्या मनांत भरून गेलेला असतो कीं कोणाला वाटावें माझा कोणी जवळचा ऋणानुबंधीच ह्या सामन्यांत खेळणार आहे.

तसें पाहिलें तर हे सारे माझे ऋणानुबंधीच नव्हेत का ? देवधर ब्राह्मण आहेत म्हणून मला ते आवडतात, अमरसिंग हिंदु होता म्हणून त्याच्या मृत्यूनें माझे डोळे वर्षाकालांतील दलबादल जलाप्रमाणें भरून गेले, किंवा मुस्ताकअली माझ्या जातीचा नव्हे म्हणून त्यानें मारलेल्या सुंदर चौकारा-

कडे पाहत मीं नाक मुरडलें, असे कधींच झालें नाहीं. मुलांनो, लक्षांत ठेवा, मीं आजवर असें कधीं केलें नाहीं व तुम्हीही असें करूं नका. जातिभेदाचें हें भूत राजकारणाच्या क्षेत्रामध्यें आज अनेक ठिकाणीं हातांत जळतें पोत घेऊन वावरत असलें, तरी त्याच्या त्या कृतान्तासारख्या काळ्या हाताचा स्पर्श, तुमच्या मनाला कधीं होऊं देऊं नका. आजवर आपलें सुदैव कीं, चौरंगी आणि पंचरंगी सामन्यांत कोठलेंही निमित्त असें घडलें नाहीं कीं तें कोठल्याही दोन जातींत परस्परांची माथेफोड करण्यास कारणीभूत झालें. हिंदु हरले म्हणून महंमद निसारला कोणीं मारलें नाहीं, आणि सी.एस. नायडूनें गेल्या सालीं मुसलमानांना थोड्या धांवांत औट घेऊन त्यांच्या गळ्यांत अपयशाची चौपदरी अडकवली म्हणून त्याच्या घराच्या जिन्यावर कोणी जीनाभक्त चढलें नाहीं. क्रिकेट खेळांत हिंदु सारखा आणि मुसलमान सारखा. हा खेळाडू पारशी आहे, आणि हा खेळाडू ख्रिश्चन आहे असे विचार मनांतसुद्धां केव्हां येऊं देऊं नयेत. त्यांत तुमचा व्यक्तिगत असा महान् तोटा आहे. कारण, अशी तुम्ही वृत्ति ठेवलींत तर तुम्हांला खेळ पाहतांना निरागस आनंदाचे धनी कधींही होतां यावयाचें नाहीं. आपल्यापुढें आदर्श ठेवतांना तुम्ही नेहमीं मनाशीं असें म्हणा कीं, "मुस्ताकअल्लीसारखे ऑन् साईडचे फटके मी मारीन. हवेवाला कसाही असो, परंतु क्रीडांगणावर येतांना कुठल्याही सामर्थ्यवान् गोलंदाजापुढें तो ज्या बेफिकिरीनें स्टान्स घेऊन उभा राहतो, ती दमदार धडाडी मी आपल्या अंगीं आणीन." पुष्कळ वेळा अशा असतात कीं, त्यावेळीं 'जरा जपून' असें म्हणून भागत नाहीं. त्यावेळीं हवेवाल्याचा छातीठोकपणा उपयोगी पडतो. हजारे ख्रिश्चन आहे. असला तर असूं दे. काय करावयाचें आपल्याला त्याच्या जातीशीं. धर्मसंघटनवाल्यांना त्याच्या जातीची चर्चा करूं दे! लेग आंखून घेतल्यानंतर सिल्कच्या शर्टच्या बाह्या वर कोपरापर्यंत घेतलेले त्याचे हात लेगस्टंपच्या रोखानें आलेले वक्रीगत चेंडू

विकेटकीपरच्या पाठीमागें मारतांना किती जलदीनें बॅट खालीं आणतो हें तुम्ही पाहिलें आहे काय? ज्यांना त्याचा खेळ पाहावयास मिळाला नसेल त्यांना मी येवढेंच सांगतों कीं विजयची बॅट ज्या शीघ्र गतीनें खालीं येते त्याची कल्पना यावयास कधीं आकाशांतून पडलेली वीज पाहा म्हणजे झालें.

विजयबद्दल देवधरांना केवढा अभिमान वाटतो. गेल्या वर्षी एखाद्या पहिलवानानें आपल्या मदोदंडानें पहार वाकवावी त्याप्रमाणें विजय हजारेनें रणजी ट्रॉफीमध्यें आजपर्यंतच्या धांवांचें सारें रेकॉर्ड मोडून टाकलें. त्यावेळीं प्रसन्न मनानें त्याचा तो खेळ पाहून घरीं परत आल्यावर, मी जेव्हां त्याच्यावर रचलेली अभिनंदनाची कल्पना फ्रेममध्यें बसवून द्यावयास देवधरांच्या घरीं गेलों, त्यावेळीं हजारेबद्दल माझ्याजवळ ते किती आदरानें चार शब्द बोलले.

१२. आजवर देवधरांनीं केलेला कुठलाच पराक्रम मी कधीं पुष्पमाला तर कधीं काव्यमाला घातल्याशिवाय दवडला नाहीं. त्यावेळेस त्यांचा विनयशील स्वभाव प्रत्यहीं दृष्टीस पडे. मीं चरित्र लिहावयास घेतलें आणि त्याचीं कांहीं पूर्ण पानें त्यांना वाचावयास पाठवलीं त्या-वेळेस त्यांच्या मुखावर बालसुलभ लज्जाभाव चमकला. शाळेंत स्कॉलर-शिप मिळालेला विद्यार्थी आप्तजनांकडून पहिली शाबासकी घेतानांही येवढा ओशाळला नसता. त्यावेळचें त्यांचें-माझें संभाषण मीं पुढें दिलें, तर मुलांनो, तुम्हाला मौज वाटेल आणि हा येवढा पराक्रमी खेळाडू इंग्लंडांत किंवा ऑस्ट्रेलियांत जन्माला आला असता तर गार्डीनर किंवा सीविलनें आपली लेखणी झिजवली असती. गार्डीनर, सीवेल आणि नेव्हिल कार्डस या तिन्ही प्रसिद्ध लेखकांप्रमाणेंच हिंदुस्थानांतील मुनशी, दत्त, फडके यांसारख्या लेखकांनीं अशा गुणवंतांचीं चरित्रें लिहावयास पुढें झालें पाहिजे. परंतु दुर्दैव असें कीं या लेखकापैकीं कोणाला सवड नाहीं, कोणाला आवड नाहीं आणि कोणाला निवड नाहीं. हें असें किती दिवस चालावयाचें? जवाहिरलालचें

कौतुक अमेरिकेनें, महात्माजींचें गुणवर्णन फ्रान्सनें, आणि टागोरांचें कौतुक टोकियोनें अशींच का प्रथा पुढें चालू द्यावयाची? साऱ्याच चरित्र ग्रंथांची हिंदुस्थानांत उणीव आहे. देशांतील महान् पुढाऱ्यांचीं चरित्रें तरी कुठें लिहिलीं गेलीं आहेत! आपल्यामध्यें लेखक आहेत. नाहीं असें नाहीं; परंतु कोणाला कधीं असें वाटत नाहीं कीं, नितंबावर नागिणीप्रमाणें हिंदळणाऱ्या नवयौवना रमणीच्या लांब सडक केशकलापाचें वर्णन करण्यापेक्षां ज्यांनीं कृष्णवर्ण कातडी वादीनें विभूषित झालेल्या चाबकाचे फटके उघड्या जंघेवर खातांना, काढणीवर बांधलेल्या करकचलेल्या देहाच्या महान् यातनेबद्दल तोंडांतून कधीं शोकसंतप्त हुंकार बाहेर काढला नाहीं, अशा "देव" माणसांचें चरित्र लिहावें. देशासाठीं, धर्मासाठीं, ध्येयासाठीं, कलेसाठीं, ज्या ज्या पुण्यवंतांनीं आपली अवघी हयात जुन्या घटिकायंत्रांतील वाळूकणासारखी खालीं सांडली, अशा थोरांच्या गुणसंकीर्तनांनीं नटलेल्या ग्रंथांच्या रांगांच्या रांगा ग्रंथालयाच्या कपाटांतून लागल्या पाहिजेत.

१३. मुलांनो, आपण काकदृष्टि सोडली पाहिजे. सभोंवतालच्या जगाकडे हंसक्षीर न्यायानें पाहावयाची दृष्टि जन्मतः नसली तर आपण प्रयत्नानें तयार केली पाहिजे. जन्मजात असमाधानी अशा माणसाची माझी एकदां हिंदु जिमखान्यावर गांठ पडली होती. हिंदु आणि मुसलमानांचा एक मोठा अटीतटीचा सामना चालू होता. परंतु मागच्या जन्मीं मीं कुठलें पाप केलें होतें कोणास ठाऊक, त्या माणसाची सारखी बडबड चालली होती. कुठल्या कुयोगावर त्याची गांठ पडली होती कोणास ठाऊक! शक्य असतें तर त्या माणसाची रवानगी मीं दुसऱ्या एखाद्या पॅव्हेलियनमध्यें केली असती. आणि वाचकांनो, तुम्ही म्हणाल कीं असा तो मनुष्य तुम्हाला काय त्रास देत होता. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे तो एक "प्रॅक्टिकल" आत्मा होता. खेळ सुरू झाल्याबरोबर त्यानें खिशांतून सिगारेटचें पाकीट काढलें आणि

सिगारेट तोंडांत घालून तो काड्याची पेटी शोधूं लागला. तंबाखूची तल्लफ कशी असते याची मला कल्पना असल्यामुळें मीच त्याच्या त्या गोंधळलेल्या मुद्रेकडे पाहून खिशांतून लाइटर काढला आणि त्याला म्हटलें 'हं, हें घ्या.' त्यानें समाधानाचा एक झुरका मारला आणि आम्ही दोघेंही खेळांत, म्हणजे बघण्याच्या खेळांत रममाण होणार तोंच हिंदळेकर आऊट गेला, आणि आतां मात्र माझ्या शेजाऱ्यानें क्रिकेटपटूचा आव आणून "छे, छे, ह्यांनीं यष्टिरक्षकाचेंच काम करावें. बॅटिंग हें ह्याचें काम नव्हे. उगाच भाव वाढवून ठेवला आहे आपल्या लोकांनीं ह्याचा" असे उद्गार काढले. त्याच्याकडे तुच्छतेचा एक जहरी कटाक्ष टाकून मी पुन्हां खेळ पाहूं लागलों. पुन्हां दुर्दैवानें जराशा वेळानीं अमरनाथ आऊट झाला. तेव्हां लागलीच "आतां ह्याचा पूर्वीचा फॉर्म राहिला नाहीं. पूर्वी काय पट्टीचा खेळाडू म्हणून हा गाजला होता. आतां सध्यां ह्यांनीं खेळू नव्हे हेच चांगलें" असे अनाठायी उद्गार काढले. माझ्या जहरी कटाक्षाची पुनरावृत्ति झाली; पण तो आपला शकराच्या पुढल्या प्राण्यासारखा निर्विकारच. वास्तविक ज्या चेंडूनें अमरनाथाचा बळी घेतला तो चेंडू कुणालाहि टाकला गेला असता, तरी त्याची तीच अवस्था झाली असती. पुनः बऱ्याच वेळानें सी. के. नायडूचा झेल उडाला. आणि त्याच्या बोलण्याचा उद्देश त्याच्या मुखचर्येवरून मला कळला आणि मग हा आतां गाढवासारखेंच कांहीं तरी बोलणार असें वाटलें आणि तो बोललाच. त्याच्याशीं मी मात्र मग वादविवाद करावयास पुढें सरसावलों. शेवटीं क्रिकेटवरून आम्हां जगांतील महान् महान् सुंदर वस्तु, राजकारणांतील अग्रावत् पुढारी, वगैरे सर्व विषयांवर बोललों. पण त्याच्या बोलण्यांत 'ताजमहालचें काय महत्त्व आहे हो तुमच्या आमच्या सारख्यांना. गुलाबाचीं फुलें म्हणे सुंदर असतात. या कवि लोकांना कांहीं

अक्कला असतात कीं नाहीं कोणास ठाऊक ! एका दिवसाच्या सौंदर्यासाठीं अगदीं लेकाचे जीव कुर्बान करून लेखण्या झिजवित असतात. गांधी कसला आला आहे महात्मा ! चढवून ठेवलं आहे झालं लोकांनीं त्याला; आणि तो जीना तरी आयुष्याच्या दादरावरून घसरला आहे, आणि जातो आहे हिंदुस्थानची फाळणी करावयाला. कशांत कांहीं अर्थ नाहीं हो.' शेवटीं कांहीं तरी खटपट करून वरच्या जागेचें तिकीट काढण्याचें ठरवून मीं त्याला सांगितलें "हें पाहा मिस्टर, तुमच्या या सर्व निरर्थक बोलण्यावरून तुमच्यांत मात्र अर्थ नाहीं हें मी आज तुम्हाला बजावून ठेवतों."

हें सांगण्याचा हेतु येवढाच कीं मुलांनो, तुम्ही ही असली असमाधानी काकदृष्टि ठेवूं नका. देवधरांचा खेळ पाहतांना 'छे बुवा, फारच कंटाळवाणा खेळ हा !' आणि लगेच नायडूंचा खेळ पाहतांना 'छे बुवा, फारच टेरिबल. Most risky Play' असे उद्गार काढावयाचे. माझा एक नवीनच असलेला मित्र मनोहर, प्रकाशक आहे. त्याच्या हातांत तुम्ही फूल दिलेत तर तो म्हणेल "हें सुवासिक खरें पण टिकाऊ नाहीं." त्याच्या हाताला तुम्ही खुशबू अत्तर लावलेत तर तो म्हणेल "वास बरा येतो, पण फुलांचा मोहक रंग यांत कुठें आहे." अशा वेळीं त्याच्या हातांत इंद्रधनुष्य जरी दिलें तरी त्याचें समाधान व्हावयाचें नाहीं. नाजुकाचा स्वीकार करतांना टिकाऊपणाबद्दल अभिलाषा धरावयाची आणि शाश्वत स्थायीभाव ज्यांत अवगुंठित झाले आहेत अशा वस्तूंचा परामर्ष घेतांना त्यांत नाजुकता नाहीं म्हणून नाक मुरडावयाचें. तसें तुम्ही करूं नका. देवधरांसारखीच तुम्ही आपली वृत्ति गुणग्राही ठेवा.

१४. येवढी प्रसिद्धी मिळवूनही, ते आपली वसती गर्वाच्या घरांत करीत नाहींत हें महाराष्ट्राचें भाग्य. तुम्ही त्यांची कधीं गांठ घ्यावयास गेलांत तर वेळांत वेळ काढून ते प्रेमानें चार शब्द तुमच्याशीं बोलतील. तुम्ही

[stamp]

कांहीं शंका विचारल्यास त्यांचेंही ते नीट प्रेमळ भाषेंत निरसन करतील. तुमच्यांतल्या गुणांचें कौतुक करून दोष असतील तर ते कसे घालवावे तेंही ते तुम्हांस समजावून देतील.

१५. आजच्या महाराष्ट्रांतील तरुण खेळाडूंकडे तुम्ही नजर लावल्यास देवधरांच्या शिकवणीनें पुढें आलेले अनेक नवजवान खेळाडू तुम्हांस दिसतील. या दृष्टीनें सोहोनी, मोहोनी, तुळपुळे यांचीं नांवें मीं जरी घेतलीं नाहींत तरी महाराष्ट्राच्या क्रिकेटक्षेत्राशीं परिचित असणारांना कळतीलच. द्रोणाचार्यांच्या किंवा भीष्माचार्यांच्या आपुलकीनें होतकरू खेळाडूंना प्रॅक्टिस देतांना स. प. च्या ग्राऊंडवर किंवा पी. वाय्. सी. जिमखान्यावर त्यांना किती जणांनीं पाहिले असेल. देवधरांनीं शिष्यपरंपरा केली नाहीं असें म्हणणारांना मग गाल चोळत बसण्याची पाळी अशा वेळीं आल्यावांचून राहणार नाहीं. जुन्या काळीं लांकडें आणणें, गुरूचें तस्त टाकणें, किंवा वेळ प्रसंगीं त्यांच्या मुलांनीं केलेली घाणसुद्धां काढून टाकण्याची तयारी असणें, या अपेक्षा आपल्याकडे बारा वर्षें विद्याभ्यासास ठेऊन घ्यावयाच्या शिष्याबद्दल गुरु करीत. रंगेल गवई याच्याहि थोडें पुढें जाऊन केवळ विनोद म्हणून शिष्याला तंबोऱ्यानें किंवा हातोडीनें मारलें असतां शिष्यानें कुरकुर करूं नये अशी अपेक्षा करीत. बिचाऱ्या देवधरांची तशी कांहींच अपेक्षा नाहीं. फक्त नियमितपणानें, चिकाटीनें, अभ्यासवृत्तीनें खेळणारे शिष्य देवधरांस हवे आहेत. आणि असे शिष्य जवळ आल्यास देवधर काय त्याला आपली कला दिल्याखेरीज राहतील. पण जनतेला काय? बे दुणे चार आणि चार दुणे आठ! ज्याअर्थीं देवधरांच्या गुरुत्वाचा छाप मारून मिरवणारे शिष्य दिसत नाहींत त्याअर्थीं देवधरांची आपले शिष्यच करण्याची तयारी नाहीं!

१६. होतकरू खेळाडूनें जर देवधरांच्या बॅटिंगमधला कोणचा गुण उचलावयाचा असेल तर तो म्हणजे त्यांच्यामधली मोहक सहजता.

लांकूडफोड्याच्या पवित्र्यानें व आवेशानें चेंडूवर हल्ला करणारे धिप्पाड, आडदांड बॅटस्मन् ज्यांनीं पाहिले असतील त्यांनीं देवधरांचे easy strokes पाहिले म्हणजे त्यांना आश्चर्याचा धक्काच बसेल. किंबहुना मी थोडें पुढें जाऊन असेंच म्हणेन कीं, सहजता हेंच देवधरांच्या जीवनाचें रहस्य आहे. सायकलच्या पॅडलवर पाय ठेवून ज्या सहजतेनें ते सायकलस्वार होतात, कादंबरींतल्या अवघड अवघड समासांची फोड ज्या सहजतेनें करतात, अंगावरचें उपरणें ज्या सहजतेनें ते सावरतात, त्याच-अगदीं त्याच सहजतेनें ते रागानें किंवा लोभानें कोणत्याही भावनेनें आलेल्या चेंडूला सीमापार करीत असतात. त्यांच्याकडे पाहिलें कीं कृत्रिमता हा शब्दसुद्धां त्यांच्या कोशांत नसेल असें वाटूं लागतें. त्यांना कृत्रीम बोलणें किंवा वागणें तर राहोंच, पण कृत्रीम हंसतां देखील येत नाहीं. त्यांच्या आयुष्यांतली कृत्रिमता शोधून काढण्याची पैज मारणाराला देवधर आपले कृत्रीम हात ठेवून त्याच्याच घशांत त्याचे दांत घालतील.

१७. देवधरांच्या बॅटीच्या पराक्रमाचा इतिहास तिथिवार व आंकडेवार जर तुम्हांला हवा असेल तर तो पुढीलप्रमाणें आहे. अर्थात् या आराखड्यांत देवधरांनीं घुमवलेल्या मोठ्या सामन्यांतील आंकडेच मी देत आहें, हें वाचकांनीं लक्षांत ठेवावें.

१९११—नॉर्थकोट शील्ड मॅच—फर्ग्युसन कॉलेज विरुद्ध झेवियर कॉलेज, मुंबई—धांवा ५६ नॉट आऊट.

१९१६—चौरंगी सामना ९६ व ७५ नॉट आऊट. जगप्रसिद्ध युरोपियन बोलर टायरंटविरुद्ध.

१९१७—काठेवाड टीमविरुद्ध ८० धांवा.

१९२५—चौरंगी सामन्यांत पारशी टीमविरुद्ध १३५.

१९२६—एम. सी. सी. विरुद्ध १४८.

१९२६–हिंदु जिमखान्याविरुद्ध १४६.

१९२७–पुणें येथें मद्रास युनायटेड टीमविरुद्ध ९५.

१९२८–चौरंगी सामन्यांत पारशी टीमविरुद्ध ८६.

१९२८–शिकंदराबाद ओपन टूर्नामेंटस्‌मध्यें १०५.

१९३०–सिलोन येथें सिलोन युरोपियन्स्‌विरुद्ध १०१.

१९४०–पुणें, रणजी ट्रॉफीमधील २४६.

माझ्या विस्मृतीमुळें कदाचित् अजून कितीतरी देवधरांच्या बॅटीचे लहान-मोठे पराक्रम उल्लेखण्याचे राहिले असतील, पण त्याबद्दल मी देवधरांच्या बॅटीची क्षमा मागतों.

१८. १९११ पासून आतांपर्यंत म्हणजे जवळ जवळ तीस वर्षें सतत खेळण्याचा मान देवधर व वझीफदार यांखेरीज हिंदुस्थानांत इतर कोणालाहि देतां येणार नाहीं. देवधरांची ही चिकाटी व तपश्चर्या पाहिली म्हणजे, डोळे मिटून रानावनांत हजारों अडचणीकडे दुर्लक्ष करून ध्यानस्थ होऊन बसणाऱ्या जुन्या ऋषीमुनींची आठवण होते. फरक एवढाच कीं ते हातांत जपमाळ धरीत तर देवधर बॅट धरतात; आणि त्यांना आपलीं पाळलेलीं हरीण-बालकें तृणरूप गालीचावरून वेगानें धांवतांना दिसलीं म्हणजे आनंदाचें भरतें येई तर देवधरांना आपण लीलेनें टपलवलेल्या चेंडूला द्रुतगतीनें क्रीडाक्षेत्रावरून धांवतांना पाहिलें म्हणजे आनंद होतो.

१९. हिंदी टीम जेव्हां इंग्लंडमध्यें खेळावयास गेली होती तेव्हां यष्टिरक्षक हिंदळेकरांची स्तुति करतांना इंग्लीश वृत्तपत्रकारांनीं त्यांना दगडी भिंतीची उपमा दिली होती. अगदीं तेच शब्द बरोबर देवधरांच्या बॅटिलाहि लागू पडतील. फ्रँक टॅरंटसारख्या जगद्विख्यात इंग्लीश बोलरच्या बोलींगवर दगडी भिंतीच्या स्थिरतेनें खेळून ९६–७५–बिनबाद मिळवलेल्या धांवा आठवल्या म्हणजे देवधरांच्या बॅटीच्या पोलादीपणाची खात्री

पटल्यावांचून कशी राहील ? दिल्लीच्या रोशनआरा क्लबातर्फे झालेल्या मॅचमध्यें रामजीसारख्या तुफानी 'बॉडी लाईन' बोलींग टाकणाऱ्या राक्षसाविरुद्ध खेळावयाची पाळी आली तेव्हां देवधरांच्या पोलादी मनगटामागें त्यांचें पोलादालाही लाजवणारें मनोधैर्य आहे ह्याची जाणीव झाल्यावांचून राहात नाहीं. डोळ्यांवरून बॉल उडत असल्यामुळें त्यावेळेला योग्य स्थळीं उभें राहून खेळणें धोक्याचें होतें. देवधरांनीं एक धाडसी गोष्ट त्यावेळेला केली. स्टम्पपासून १० फुटांवर उभे राहून चेंडूचा पहिला टप्पाच त्यांनीं गांठला व रामजीच्या बोलींगच्या आगींत जवळ जवळ पाऊणशेंवर धांवा काढल्या. बॉडी लाईन किंवा फिरकीचें बोलींग (गुगली) चोपण्यास केवढें धाडस व चतुराई लागते तें प्रत्यक्ष तशा प्रकारच्या बोलींगवर खेळल्याखेरीज कळावयाचें नाहीं. अर्जुनानें म्हणे पाण्यांतल्या प्रतिबिंबाकडे पाहून डोक्यावरचा मासा नेमानें उडवला—मोठमोठ्या राजपुत्रांना तें जमलें नाहीं. अगदीं तसेंच देवधरांचें झालें आहे. देवधर अर्जुनाच्या कौशल्यानें, जर्मन शिपायाच्या तडफेनें, इंग्लीश शिपायाच्या कावेबाजपणानें कोणच्याही जातीचें बोलींग फोडून काढतात. अमरची किंवा अमरनाथाची शिरकाण झाली तरी हरकत नाहीं पण सिक्सर्स मारून प्रेक्षकापुढें आपल्या कौशल्याचें दारूनळें उडवावयाचें ही जोहारी वृत्ति देवधरांची नाहीं. खेळाच्या यशावर डोळा ठेऊन धिम्मेपणानें खेळणें हीच कल्पना त्यांच्या डोळ्यांपुढें मुख्यतः असते.

२०. देवधरांचें कालपरवांचे महान् पराक्रम सोडले तर त्यांना जागतिक नांवलौकिक मिळवून देऊं शकला असा त्यांचा खेळ झाला तो १९२६ सालीं झालेल्या एम. सी. सी. बरोबरच्या टेस्ट सामन्यांत; त्या जगद्विख्यात टीमबरोबर आलेल्या जगप्रसिद्ध गोलंदाजांना त्यांनीं आपल्या बॅटीच्या फट-

त्यांनीं बेदिल करून सोडलें. एक नव्हे, दोन नव्हे, दहावीस नव्हेत तर प्रचंड अशा १४८ धांवा त्यांनीं काढल्या.

सत्य हें कल्पनेपेक्षां आश्चर्यजनक असतें, असें जें म्हटलें जातें, तें अगदीं खरें आहे. ज्या सामन्यांत देवधरांनीं हा प्रचंड स्कोअर केला त्या सामन्यांत त्यांना घ्यावें कीं नाहीं याबद्दल समितींत बराच वेळ रण माजलेलें होतें. केवळ नशिबाची रेषा म्हणूनच देवधरांना ती सुवर्ण संधि मिळाली असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यावेळीं कर्मधर्मसंयोगानें हिंदूंच्या टीममधील बरेच ' फर्मास ' खेळाडू आजारी पडत होते. त्यावेळचे लोकप्रिय कॅप्टन पी. विठ्ठल यांचाही 'फॉर्म' तन्दुरुस्तीमुळें असावा तसा नव्हता. परंतु सिलेक्शन कमिटीपुढें असा प्रश्न पडला कीं, कसलेंही कारण असलें तरी संघाच्या नायकाला खेळूं नका असें कसें म्हणावें ?

जें साहस 'कंट्रोलबोर्ड' देवधरांच्या बाबतींत चार वर्षांपूर्वी करूं शकला तें कांहीं त्यावेळीं त्यांच्यानें करविलें नाहीं, ही गोष्ट खरी. मग त्यावेळची परिस्थिति कदाचित् वेगळीही असेल.

योगायोगाची गोष्ट म्हटली तरी चालेल पण 'देवधरां'ना घेत असाल तर मी खेळत नाहीं असें विठ्ठलनें आपलें म्हणणें सर्वांपुढें मांडलें. आणि अशा रीतीनें देवधरांना त्या सामन्यांत भाग घेतां आला.

मोठें यश हें असेंच अकल्पितपणें मनुष्याच्या वांट्याला येत असतें. आणि म्हणूनच तरुण मनानें हें लक्षांत ठेवावें कीं, तात्कालिक अपयश येत आहे असें वाटलें तरी आपल्या प्रयत्नांत बिलकूल कसूर करूं नये.

माझ्या ओळखीच्या एका चांगल्या दर्जाच्या खेळ खेळणाऱ्या टेनिसपटूचीही गोष्ट मला ठाऊक आहे. प्रथम दोन तीन वर्षें त्यानें चांगलें प्रॅक्टिस केलें. आपल्या स्वतःच्या जिमखान्यांतील तो एक चांगल्यापैकीं खेळाडू म्हणून ओळखला जाऊं लागला. पुढें जिल्ह्यातर्फे झालेल्या ओपन

टूर्नामेंटस्‌मध्यें खेळण्यासाठीं त्यानें नांव नोंदविलें. तसल्या सामन्यांत अर्थातच गांवोगांवचे चांगले खेळाडू आले होते. पहिल्या राऊंडमध्यें माझा तो दोस्त विजयी होऊन पार पडला. पण पुढें ? एका लहानसर मुलाकडून त्याचा लव्हसेट घेऊन पराभव झाला. एरव्हीं प्रसन्न असणारें त्याचें मुखकमल या गोष्टीमुळें हाय खाऊन सुकलेल्या प्राजक्तासारखें म्लान झालें. संध्याकाळीं बोलतांना तो मजजवळ अगदीं डोळ्यांत पाणी आणून म्हणाला " बस्स, यापुढं रॅकेटला स्पर्श करावयाचा नाहीं." मीं त्याची नाना तऱ्हेनें समजूत करून पाहिली पण रामा, शिवा, गोविंदा ! तो पुनः डोळ्यांत पाणी आणून म्हणे " नातू, तुम्ही सांगतां तें खरें, पण एका पोराकडून मार खाल्ल्यावर निलाजरेपणानें पुढें प्रसिद्धी करण्यांत कांहीं अर्थ आहे कां ? आपल्याला जमत नाहीं हेंच खरें. "

असेंच कांहीं दिवस लोटले. रोज मी माझ्यापरीनें त्याला सांगें, परंतु दोन महिने निघून गेले. त्यानें देखील ग्राऊंडवर पाय ठेविला नाहीं. सर्वांना या गोष्टीचा राहून राहून विषाद वाटला. रोज नियमानें निष्ठापूर्वक सकाळ–संध्याकाळ कोर्ट रिझर्व्ह करून खेळणारा हा माणूस असें काय करतो. पुढें एक दिवस असेंच बोलत असतांना मीं त्याला आपल्या चरित्रनायकाच्या आयुष्यांतील बऱ्याच प्राथमिक अपयशांचें वर्णन करून त्याची खात्री पटविली. आणि सांगावयाचें तात्पर्य असें कीं, पुढें एक दोन वर्षांत चँपियन म्हणून तो गाजला. त्याच्या यशाबद्दलचें सारें श्रेय तो कृतज्ञताबुद्धीनें मला देऊं पाहतो. अर्थातच त्याच्या पराक्रमाची कर्ती त्याचीं दमदार मनगटें. मी निमित्ताला कारण. थोरांच्या चरित्रकथनानें पुष्कळांचें आयुष्य असेंच मार्गाला लागतें.

२१. कुठल्याही कलेंत अगदीं पुढील रांगेंतील खुर्ची पटकावयाची म्हणजेच एवढी प्रगति असून चालत नाहीं. नुसते गज्जल किंवा नुसत्या कवाल्या

म्हणून कुठला गवई अग्रेसर ठरला आहे? क्रिकेटमध्येंसुद्धां 'ऑल राऊंड' असलों तरच मोठ्या सामन्यांत आपलें प्रस्थान मांडतां येतें. सर्व बाजूनें थोडें थोडें कां होईना पण प्रसंगीं उपयोगी पडेल इतपत कौशल्य आपल्या अंगीं असावयास पाहिजे.

आणि या नियमावर जरी आपल्या चरित्रनायकाच्या गुणसुवर्णाला पारखून पाहिलें तरी तें सरस आणि सरसच ठरणार. कारणें खालील-प्रमाणें:—

( १ ) एकाकाळीं विकेट किपर होते.

( २ ) 'उत्तम' मध्यमप्रतीचे गोलंदाज आहेत.

( ३ ) फिल्डिंगमध्यें 'स्लिपला' त्यांचा हात धरणारा प्लेअर शोधूं पाहतां मिळावयाचा नाहीं.

याचा अर्थ एवढाच कीं, क्रिकेटचीं जीं सर्व अंगोपांगें आहेत त्यांत आपलें चरित्रनायक प्रवीण आहेत. आणि ते तसे आहेत म्हणूनच त्यांचें चरित्र लिहावयासाठीं माझी लेखणी द्रुतगतीनें कागदावर नृत्य करूं लागली. नांवें न घेतां या ठिकाणीं मी एवढेंच सुचवितों कीं, अनेक विख्यात होऊं पाहा-णाऱ्यांच्या ध्यानांत हें सर्वांगीण प्रगतीचें तत्त्व येत नाहीं. माझ्याबद्दल वाचकांनो, तुम्ही मात्र या गोष्टीकडे कानाडोळा करूं नका.

एकटा अमरनाथ हाच एक खेळाडू या बाबतींत देवधरांनाही मागें टाकणारा आहे आणि म्हणूनच हिंदुस्थानांत खेळल्या जाणाऱ्या प्रत्येक मोठ्या मॅचमध्यें यादी करतांना पहिलें नांव त्याचें लिहिलें जातें. तो उत्तम बोलर आहे. यष्टिरक्षक म्हणून तर त्याचा प्रथम या पंचरंगी सामन्यांत प्रवेश झाला आणि बॅटिंगबद्दलची त्याची माहिती आबालवृद्धांना आहे. त्याचें यष्टिरक्षण असें आहे कीं, हिंदळेकर जर एखादे वेळीं आजारी पडले तर हिंदुसंघाची तो अडवणूक होऊं देणार नाहीं.

देवधरांचें बोलींग अमरनाथपेक्षां सरस नसलें तरी वेळप्रसंगीं पुण्यांत रणजी ट्रॉफीच्या सामन्यांत ‘ जाय ’ सारख्याची मौल्यवान विकेटसुद्धां ते ‘ पॉकेट ’ करूं शकतात.

पुष्कळ वेळां माझ्या मनांत असें येतें कीं हिंदुसंघांत असे अतिरथी, महारथी असतांना त्याला अनेक सामन्यांत अपयश कां बरें येतें.

महमंद निसार, सी. एस्. नायडू, बानर्जी यांसारखे उत्तम गोलंदाज ज्या टीममध्यें आहेत ती टीम नामोहरम ठरली जाते याचा अर्थ काय ?

ज्या संघामध्यें नायडू, मुस्ताक, काद्री, अमरनाथ, देवधर, मर्चंट यां-सारखे बॅटबहाद्दर आहेत त्या संघाच्या कपाळीं विकेट्सनें मारा खावयाची पाळी यावी याला कारण खेळांतील न्यूनपणाखेरीज दुसरें कुठलेंही असणें शक्य नसेल काय ?

हिंदळेकरासारखा कुशल व संधिसाधू यष्टिरक्षक असून आम्ही जागतिक सामन्यांत कधींहि लौकिक मिळवूं शकलों नाहीं, याची कारणपरंपरा कोणीतरी शोधून काढावयाचा प्रयत्न करावयास नको काय ?

बॉबी तल्यारखाननें या विषयासंबंधीं तोंड काढावयास हवें. जातीचे सामने भरवावे कीं न भरवावे या प्रश्नापेक्षां या अपयशाचे धनी करणाऱ्या गोष्टीची अटकळ करून त्यांचा नायनाट कसा करतां येईल यासाठीं त्याच्या-सारख्यानीं पुढें पाऊल टाकलें पाहिजे.

बरींच वर्षे चिकित्सा करून माझें असें ठाम मत झालें आहे आणि ज्याचा येथें उर्ध्वस्वरांत उच्चार करतांना मला कुणाचीही मीडभाड ठेवावयाचें कारण नाहीं, ती म्हणजे.........

...परंतु आधीं प्रथम मला हें सांगावयाच हवें कीं, जी ‘ तक्रार ’ मी आज ‘ चव्हाट्या ’वर आणणार आहे ती आणल्यामुळें ज्या व्यक्तींचीं

मनें दुखवलीं जाणार आहेत त्यांनीं मला क्षमा करावी. त्यांच्याबद्दल व्यक्तिशः माझ्या मनांत अणुमात्र वाईट भावना नाहीं.

प्रामाणिकपणें आपलीं मतें माणूस मांडू लागला कीं, थोडीशीं 'चिर-फाड' ही व्हावयाचीच. दुर्धर रोग बरा करतांना 'सर्जन'ही थोडा निष्ठुर होतोच.

मला असें म्हणावयाचें आहे कीं, हिंदुस्थानांत जे खेळाडू आहेत ते आपापल्यापरीनें सर्वश्रेष्ठ आहेत.

—परंतु.........

त्यांच्यांत 'संघशक्ति' म्हणून जी कांहीं लागते ती औषधापुरतीहि नाहीं. आणि सामने जिंकले जातात ते 'एकट्या'च्या पराक्रमावर नसून सर्वत्रांच्या एकोप्यावरच.

परंतु ही गोष्ट आमच्याकडील श्रेष्ठ श्रेष्ठ खेळाडूंनाही कळत नाहीं. एकटे देवधर आणि थोडेसे विजय मर्चंट सोडले तर सारे रजपूत लढवय्यासारखे 'इन्‌डिव्हिज्युयालिस्ट.'

आणि या वृत्तीमुळें आपण जगांत अपयश पदरीं पडून बसलों.

ज्या दिवशीं 'माझा खेळ मी खेळणार' असली वृत्ति आपल्यांतल्या उत्तम प्रतीच्या क्रिकेटपटूमधून नाहींशी होईल त्या दिवशीं एम. सी. सी. च काय परंतु इंग्लंड-ऑस्ट्रेलियाच्या कम्बाइंड टीमला आपण 'जीव हरलों' म्हणावयास भाग पाडूं.

मुलांनो, तुम्ही विचार करा; आपल्यांत कोण नाहीं आणि आपल्यांत काय कमी आहे.

आपल्यांत 'टेट फुल फॉर्म'मध्यें असतांना त्याच्या हुकुमी हातांतून सुटणाऱ्या टॉर्पेडोना दशदिशांना लोळवणारा "दिनू देवधर" आहे.

जगद्विख्यात बॉडी लाइन चेंडू टाकणारा बॉलर लारवूड हा आपल्या

हातांतून बंदुकीच्या गोळीच्या वेगानें चेंडू टाकीत असतांना धिमेपणानें त्याला दाद न देतां सबंध दिवसभर क्रीडांगणावर त्याला तोंड देत देत जिब्राल्टरच्या भिंतीप्रमाणें उभा राहणारा विजय मर्चंट आपल्यामध्यें आहे. कुशल गोलंदाज ब्रोस हा आपल्या हातांत चेंडू घेऊन इंद्रजाल निर्माण करतो. कंचनीनें किनखापी गालीच्यावर आपल्या परमकोमल चरणद्वयांत नूपुर बांधून मोहिनी-नृत्य सुरू करावें आणि आपल्या अगोगंगाच्या मोहक हावभावांनीं बलवान धनवंताला ।लिलयाविद्ध करावें तशी ब्रोसची चेंडूफेंक. प्रेक्षकाला वाटावें कीं, हा चेंडू फेकतो आहे कीं चेष्टा करतो आहे, येवढी हाताची चाल मानभावीपणाची. त्याच्या या पऱ्या चेंडूवरसुद्धां नाबाद शंभर धांवा काढणारा मुस्ताक आमच्यामधें आहे.

नरसिंहाचा अवतार घेऊन आलेल्या भगवानानें उंबरठ्यांत अवसानानें हिरण्यकश्यपूला मांडीवर घेऊन त्याची चिरफाड करावयासाठीं आपलीं नखाग्रें सिद्ध करावीं तशा अवसानांत टेस्ट सामन्यासाठीं क्रीडांगणावर उतरलेल्या पराक्रमी हिंदुसंघाची सुरवात ज्यानें आपल्या गोलंदाजीनें कापून काढली त्या क्लार्कला 'थांब तुला मी कोण ते दाखवतों' असें म्हणून अमरनाथ शें-दोनशें धांवा काढून आपण पदार्पण केलेल्या पाहिल्याच सामन्यांत अजरामर झाला आहे, तो अमरनाथ अजूनही आपल्यांत खेळत आहे.

गोलंदाजींत तरी आपण कमकुवत आहोंत का? तुफानाला आपल्या चेंडूच्या वेगानें मंदगती म्हणूं शकेल असा वेगवान गोलंदाज निसार. फसवे चेंडू टाकतांना ज्याचें अवसान चित्याच्या पवित्र्यासारखें घातकी, पराक्रमी आणि दिसावयास साधें असें असतें असा सी. एस. नायडू आपल्यांत आहे.

याशिवाय अमरसिंगासारखा युरोपमध्यें अतुल ठरलेला खेळाडू आपल्यांत आजपर्यंत खेळत होता. क्रीडांगणांतील त्याचें व्यक्तित्व कितीतरी तऱ्हेनें व्यक्त

yeh

होत असें. लहान मूल खालीं न वाकतां चतुराईनें पुढून टाकलेला चेंडू पायां-वरून ओढून चतुराईनें हातांत घेतो तसें तो करी म्हणून त्याला मोठा मानीत. क्रिकेटमधील तज्ज्ञ मंडळी त्याच्या बोलिंगवर खूष असत. एका प्रसंगीं नेटमध्यें प्रॅक्टिस करीत असतांना त्याचें बोलींग मला अगदीं जवळून पांहावयास मिळालें. त्याच्या चेंडू फेकण्यांत किती नाना तऱ्हा होत्या आणि ते खेळणाऱ्या फळीधराला किती सिद्धसाधकपणावरून खेळावें लागत असें याची जाणीव मला त्यावेळीं झाली. एखादा चेंडू दारूच्या बाणासारखा सूं सूं करीत येई तर दुसरा अगदीं जवळ येई तोंपर्यंत "मी साधा मी साधा" असें जणूं काय तोंडानें म्हणत म्हणत सावकाश सावकाश येत असे. सवा सवा फूट रुंदीचे ब्रेक पडलेले मीं पाहिले आहेत. त्यानें टाकलेल्या इनस्विंगर्सची मोहकता येवढी चित्तहारी होती कीं, आऊट झालेल्या खेळाडूनेंही स्वतः व्यक्तिगत नुकसानीचा मनावरील ताण विसरून म्हणावें–वाहवा ! आणि हा असा 'अमर' कालपरवांपर्यंत आपल्यांत खेळत नव्हता का ?

हे सर्व होते. अर्जुनासारखा मुस्ताक होता, भीमासारखा निस्सार होता, भीष्माचार्यासारखे देवधर होते, कर्णासारखा अमरनाथ होता, श्रीकृष्णासारखा विजय होता, हे येवढें असून आपण आजवर सारखे अपेशी ठरलों.

हे सारे संघशक्तीनें खेळले असते तर जगांतल्या कोणत्याही टीमबरोबर विजयी ठरले असते. अगदीं ब्रॅडमन, हॅमंड एका टीममधून आपल्याविरुद्ध खेळले असते तरी आपण सामना निकराचा दिला असता.

परंतु मुलांनो, चंद्राला कलंक असावा, सागराला ओहोटीचें न्यून असावें, तसें हें न्यून आजवर आपल्यामध्यें जळवेच्या चिकाटीनें चिकटून बसलें आहे. एका साध्या भ्रमरानें 'चंद्रसेना' निर्माण केली. खिळा कसला म्हणून नाल जातो, नाल पडला कीं घोडा निकामी होतो, आणि घोड्याच्या

निकामीपणामुळें स्वाराच्या जिवावर बेततें आणि मग सारी लढाईच हातची जाते. त्याच अनुषंगानें हें सारें घडतें.

मी आपल्यांतील साऱ्या खेळाडूंना सांगूं इच्छितों कीं, तुम्ही देवधरां-पासून येवढी गोष्ट उचला म्हणजे सारें कोडें सुटल्यासारखें होईल.

देवधरांनीं व्यक्तिनिष्ठ पराक्रमाकडे आजवर लक्ष दिलें असतें तर आज-च्यापेक्षां जास्त प्रसिद्धी आणि जास्त महत्त्व त्यांना मिळालें असतें. कारण, दुनियेच्या डोळयांत शिस्तप्रिय सेनापतीपेक्षां स्वतंत्र बुद्धीचा बंडखोर जास्त साहसानें भरतो.

आपल्याकडील शाहिरांना बापू गोखल्यापेक्षां उमाजी नाइकाची कीर्ति डफावर घुमवाविशी वाटली ती यामुळेंच. आणि लोकांची ही अभिरुचि लक्षांत घेऊनच ड्यूमासनें आपलें स्टीम्सूटर्स निर्माण केलें आणि थॉमस एडिसन, जॉर्ज वॉशिंग्टन्, आब्राहम लिंकन, गारफील्ड ह्यांच्या चरित्रांकडे ढुंकूनही न पाहतां रजतपटावर ब्लॅकपॅरट, रॉबिनहूड अशीं चरित्र-चित्रें रंगविलेलीं लोकप्रिय होतात.

परंतु यामुळें व्यक्तिगत फायदा कितीही झाला तरी मोठ्या प्रमाणांत सांघिक करामत करून दाखवितां येत नाहीं. एकट्यानें किल्ला सर करतां आला, खजिना लुटतां आला, परंतु महाराष्ट्र स्वतंत्र करतां आला नाहीं. शिवाजीला मावळ मराठा, बांधलेल्या लांकडी मोळीसारखा एकत्र बांधावा लागला. शतकें काढून " अमर कीर्ति " मिळवितां येईल, परंतु शतकें न काढूनही देवधरांसारख्या माणसाला संघाला विजय मिळवून देता येईल. परंतु ही गोष्ट साध्यासुध्या माणसाला जमणें शक्य नाहीं. कर्णासारखे पराक्रमी पुष्कळ असतात, त्यागपुष्प हें दुर्मीळ आहे, तें एखाद्यालाच लाभतें. पण त्याचा त्याग मात्र महाभारतांत कोणत्या वीरापाशीं सांपडेल? एखादाच त्याचा स्वीकार करतो. देवाच्या दयेनें आणि महाराष्ट्राच्या भाग्यानें या थोर

गुणानें मंडित झालेले देवधर आज आपल्याला लाभले आहेत. पुढें त्यांचें मोठें चरित्र ज्या वेळेस मी लिहीन त्यावेळेला त्यांनीं केलेल्या अनेक प्रकारच्या त्यागाचें मी उदाहरणानें वर्णन करीन. देवधरांच्या अंगचा हा गुण तुम्ही जरूर अंगीं बाणवा. देवधरांच्या सबंध चरित्राचें तुम्ही सिंहावलोकन करा. तुम्हांला एक गोष्ट आढळून येईल कीं, नसत्याचा हव्यास त्यांनीं कधीं धरला नाहीं. त्यागाच्या उदात्त माणिकुंडलानें नटलेले असे ते चार आण्याचा चामडी पट्टा कंमरेला बांधून क्रिडांगणावर उतरले म्हणून काय त्यांची योग्यता छानछुकी पोषाखानें नटलेल्या, आपली बॅट संस्थानिकाला विकलेल्या खेळाडूपेक्षां कमी आहे? पैशाचा लोभ त्यांनीं कधीं धरला होता? खेळासाठीं त्यांनीं विद्येला कधीं दूर लोटलें नाहीं. असा दुसरा एक तरी खेळाडू मला दाखवा. विजयमर्चंटसारखे ते लक्षाधीश नाहींत. ते ज्या पगारावर आज काम करीत आहेत त्या साम्पत्तिक परिस्थितींत असलेलीं हजारों माणसें माझ्याभोंवतीं मी पाहतों. भल्याबुऱ्या मार्गानें ते कवडीसाठीं कवटी फोडावयाला कमी करीत नाहींत, टक्का मिळविण्यासाठीं धक्का देतात, लाख मिळत नसतील तर दुसऱ्याच्या घराची राख करावयास मागें पुढें पाहत नाहींत. अशा या सर्व जंजाळांतून दृष्टि काढून ती जेव्हां आम्ही देवधरांच्याकडे वळवितों तेव्हां आदरानें मान खालीं वाकते.

आणि म्हणूनच दहा क्रिकेट सम्राटांचीं चरित्रें लिहावयाचीं ठरवितांच मीं पाहिलें पुष्प गुंफावयाचा मान या त्यागी पुरुषाला दिला.

१२ सागराच्याभव्य विस्ताराकडे पाहून मन कुंठित व्हावें, अगदीं तशी स्थिति गेल्या वर्षांतील देवधरांच्या या क्षेत्रांतील कामगिरीकडे पाहून होते. विद्येनें आणखी क्रीडेनें एकसमयावच्छेदेंकरून मंडित झालेला माणूस यापूर्वीं जन्मास आलेला नव्हता. आणि पुढेंही जन्मास येईल असें वाटत नाहीं.

त्यांच्या सांपत्तिक त्यागाचें एक साधें उदाहरण येथें सांगतों. कांहीं वर्षांपूर्वी मानवदारच्या महाराजानें त्यांना आपल्या बाजूच्या टीमकडून खेळण्यास येतां कां म्हणून पैसे पाठवून विचारणा केली. त्यावेळेस देवधरांनीं त्यांस कळविलें कीं, मी पैसे घेऊन कुठेंही खेळावयास जात नाहीं. मला सवड असली तर मी आपला पाहुणा म्हणून आपल्याकडून खेळावयास येईन. पुढें देवधर तेथें खेळावयास गेले, त्या वेळेला त्यांची व्यवस्था महाराजांनीं आपले खास पाहुणे म्हणून ठेवली होती. दुसरा दिवस उजाडला त्या वेळेला आपल्या चरित्र नायकाच्या खेळावर खूष होऊन महाराजांनीं विचारलें, " मिस्टर देवधर, मी आपला खेळ पाहून खूष झालों आहे आणि आपणास कांहीं रक्कम द्यावी असा माझा विचार आहे."

त्यावर हा त्यागी पुरुष उत्तरला, " मी स्वतः खेळावर पैसे मिळवि-ण्याच्या विरुद्ध आहे. परंतु आपल्याला जर कांहीं द्यावयाचेंच असेल तर तें मी ज्या शिक्षणसंस्थेचा एक भाविक पुजारी आहें, तिला द्या." आणि देवधरांच्या या उत्तरानें विस्मयचकित झालेल्या महाराजांनीं दोन हजाराचा चेक फाडून देवधरांच्या हातांत दिला.

स्वतःच्या व्यक्तिकौशल्यावर मिळवलेला पैसा ऋण समजून ज्या ज्या संस्थाशीं आपला संबंध आहे अशा संस्थांना देणें किती त्यागाचें आहे, ह्याची जाणीव जर क्रिकेट–सम्राटांना झाली तर बुडणाऱ्या संस्थांना आणि त्यावर तगणाऱ्या–अवलंबून असलेल्या गोरगरिबांना आधार तरी केवढा मिळेल! मुलांनो, तुम्हाला नाहीं कां असें वाटत? जीवनाचें सार्थक म्हणजे त्याग आणि तो अंगीं आणावा लागतो. त्याचें सोंग करतां येत नाहीं. आणि त्यागाची ही इमारतसुद्धां वाटते त्या मनोभूमीवर उभी राहूं शकत नाहीं.

# देवधर

मुलांनो, आपल्याला नामवंत व्हावयाचें असेल तर अवघ्या आयुष्यांत मोहाचे अनेक प्रसंग लाथाडावे लागतात. कीर्ति प्रसन्न होते ती धनदौलतीनें नव्हे. तिला कृतज्ञ करावयास देवधरांच्यासारखें आपलें वर्तन त्यागी हवें.

थोडा त्याग वारंवार करीत चला. आपल्या स्नेह्यासोबत्यांना, आप्तांना त्यामुळें तुम्ही कायमचें वश करून टाकाल.

धाकदपटशाहीनें जगांत कांहीं गोष्टी करतां येत नसतील असें नाहीं, परंतु त्यांत स्वारस्य नाहीं.

कमलपुष्प किती नाजूक असतें हें तुम्हांस ठाऊक आहे ना? ज्याच्या मोहक 'परिघा'चा 'उमल' करावयास ब्रन्सीनें नाजूक किरणशलाकांची योजना करतांना त्यांनाही बजावून सांगितलें असेल कीं 'जरा सावकाश हं...'

आणि अशा पुष्पाच्या त्या नाजूक पाकळ्या शिसवी संथपणें पोखरून आरपार जाणाऱ्या भ्रमराला रात्रभर कैद करूं शकतात.

कमळाच्या पाकळ्या म्हणजे फुलपाखरांचे नाजूक नाजूक इवले इवले पंख.

व्यवहारी माणसाला हें पाहावयाचें नाहीं. स्वार्थी माणसाला हा 'चमत्कार' दिसावयाचा नाहीं.

परंतु तुम्हीं विचार केलांत तर तुम्हांस कळून येईल कीं, सत्तेपेक्षां प्रेमांत आणि स्वीकारापेक्षां त्यागांत 'मनुष्य'ता जास्त असते.

माझ्या स्वतःच्या जीवनांत असाच एक महान् क्रांतीचा क्षण आला आणि मी 'मार्गाला' लागलों. देवधरांचे कौतुकास्पद गुण बहुशीं अंगीं बाणवलेत तर बाणवा, पण किमान आज त्यांचा त्याग जरी तुम्हीं अंगीकारलांत तरी मी म्हणूं शकेन 'मार्गावर आहे.'...

क्रिकेटचा खेळ खेळतांनासुद्धां आयुष्यांत उपयोगी होतील असे सद्गुण जवळ करण्याची—शिकण्याची संधि मिळते, हें आतां तुम्हांस पटलें असेल.

२३ संघासाठीं म्हणून कांहीं जबाबदारी पत्करून नायडू मैदानांत

उतरतील तर माझी खात्री आहे कीं, ते 'गॅलरी'साठीं 'सिक्सर' मारावयाच्या भानगडींत पडणार नाहींत.

ज्यांनीं ज्यांनीं म्हणून संघासाठीं खेळ खेळावयास कमर कसली त्यांना त्यांना दुनियेनें धन्यवादाचे हारतुरे दिले.

डॉन ब्रॅड्मनचा खेळ किती जलद असतो. डेक्कन क्वीननें आपल्या गतियंत्रांत मैलामागून मैल मरडून काढावे तसें हें 'धांवांचें यंत्र' खेळूं लागलें म्हणजे लंचपर्यंत शंभर, टी टाईमला दोनशें, आणि खेळ बंद होतांना तीनशें अशा वेगवान धांवा काढल्या 'तरी कमीच' म्हणत निःश्वास सोडावयाचे !

परंतु तोच डॉन प्रसंगीं 'स्टेडी' खेळूं लागतो. विजेनें जड पदार्थाची स्थीरता स्वीकारलेली तुम्हीं कधीं पाहिली आहे कां ?

धबधबाकृति पतनस्थलावरून मंदमंद गतीनें पण्यांगनेसारखी चाललीं आहे कां ?

बंदुकीचा छरा एकदा वायुवलयांचा चिरोटा खात...त्यांला छेद देत पुढें पुढें चालला म्हणजे मध्येंच स्थिरगति होऊन पुनः मार्गाला लागणें शक्य आहे कां ? या अशक्य गोष्टी ब्रॅडमनचा प्रसंगवशात् होणारा 'स्टेडी' खेळ पाहून खऱ्या होतील असें तुम्हांस वाटेल.

आणि अमरनाथांनींही 'चित्तवेधकतेच्या' मागें जरा कमी लागावें. संघ संकटांत नसला म्हणजे खुशाल त्यांनीं आपल्या खेळांत सौंदर्य ओतावयाच्या मार्गाला लागावें. परंतु एकादे वेळीं... गेल्या वर्षी संध्याकाळच्या वेळीं अगदीं खेळ संपावयास मिनिट दोन मिनिट उरले असतांना तो औट गेला. आणि त्याचें कारण...... एक अस्ताव्यस्त पडलेला ऑफ्ब्रेक की जो त्यांना लेगकडे सहज टोलवितां आला असतां तो चेंडू विकेटमागील

स्क्रीनकडे खेंचावयाचा त्यांचा हव्यास........ तो हव्यास कांहीं कमी कौतुकास्पद नव्हता.

दुसऱ्या कुठल्याही प्रसिद्ध खेळाडूला तो फटका मारतां आला नसता. परंतु हें साहस अमरनाथानें त्यावेळीं करावयास नको होतें.

कारण, असें पाहा, त्यावेळीं संघाच्या धांवा कांहीं फार झाल्या नव्हत्या. आणि अमरनाथाच्या खेळावर पुढच्या साऱ्या गोष्टी अवलंबून होत्या. परंतु या सर्व गोष्टी...जबाबदारी तो विसरला आणि उंच झेल उडला जाऊन औट झाला.

देवधर ज्या ज्या वेळीं एखाद्या संघाचे कॅप्टन असतात त्या त्या वेळीं संघांतील प्रत्येक खेळाडूला ते त्याची वैयक्तिक जबाबदारी विशद करून सांगतात.

अनेक 'चक्रें' एकत्र येऊन घड्याळ तयार होतें. संघ हा असाच अनेक 'खेळाडूं'च्या समरसतेनें तयार होतो. एखादें मोठें कार्य पार पाडावयास जेव्हां आपण एरव्हीं एकत्र जमतों त्यावेळीं वेगवेगळीं कामें जशीं जमतील तशीं आपण वाटून घेतों. आणि तीच गोष्ट संघाची. देवधर आपल्या टीमची निवड कुशलतेनें करतात. रत्नपारख्याला शिवारांतलें रत्न वेंचून घेतां येतें. देवधरांनीं कितीतरी 'नवरत्नमाला' शोधून काढून पुढें आणल्या आहेत.

वर सांगितल्या त्या गोष्टी एकदां नीट समजल्या म्हणजे तुमच्या ध्यानीं येऊन चुकेल कीं एखाद दुसरा खेळाडू जरी गैरवाजवी रीतीनें आणि नको त्यावेळीं औट झाला तरी संघ 'अपसेट' होऊं शकतो. उन्हाळ्या-नंतर पावसाळा आणि पावसाळ्यानंतर हिंवाळा असे सृष्टीचे नियम आहेत. ह्या नियमाप्रमाणें सारें चालतें. खेळांतसुद्धां कुणी केव्हां, आणि कशासाठीं खेळावयाचें याचे कांहीं हेतु आहेत.

मुलांनो, देवधर हिंदु संघाचे कप्तान झाले आहेत हें तुम्हांस ठाऊक

आहे. आतां शिलोन टीमशीं सामना देतांना ते साधारणपणें खेळावयासाठीं अशा क्रमानें गडी धाडतील.

१ विनु मनकड–संथ खेळण्यासाठीं.

२ मर्चंट–संथ खेळतां खेळतां धांवा काढण्यासाठीं.

३ देवधर–वरच्यापैकीं कुणी औट झाला तर जो औट झाला असेल त्याचें कार्य पार पाडण्यासाठीं.

४ अमरनाथ–या खेळाडूवर फक्त जलद गतीनें धांवांची संख्या वाढवावयाची जबाबदारी असते.

५ मुस्ताकअली–यानें बोलरचा दम उखडावयाचा असतो.

६ भांडारकर—धांवा वाढवणें.

७ रांगणेकर—धांवा वाढवणें.

८ सी. एस्. नायडू––स्टँड देणें, आणि प्रसंग पडल्यास अटॅक करणें.

९, १०, ११ } हे तीन खेळाडू बोलर म्हणून संघांत घेतलेले असतात. त्यांचें काम म्हणजे मिळतील त्या धांवा मिळवणें.

आणि म्हणूनच नवव्या विकेटला जी धांवांची संख्या असते तीच बहुतेक थोडीशी पलीकडे जाऊन संघाची ‘ टोटल ’ ठरते.

आतां तुमच्या ध्यानांत यावयास वेळ लागणार नाहीं कीं, दोन तीन खेळाडू जरी ‘बेजबाबदारी’नें खेळले तरी ठरविलेली सारी घडी विसकटून जात नाहीं.

वास्तुशास्त्रांत कमानीच्या मध्यबिंदूवरील दगडाला चावीचा दगड असें म्हणतात. त्याचें कारण असें कीं, त्याच्या ‘सेंटर ऑफ ग्रॅव्हिटी’ वर कमानीची इतर ‘फत्तरपरंपरा’ आधारलेली असते.

संघाचा 'की स्टोन' म्हणजे नंबर तीनचा किंवा नंबर चारचा खेळाडू, आणि म्हणूनच देवधर नेहमीं चवथे जातात.

जी जबाबदारी त्यांनीं अंगावर घेतलेली असते तीमुळेंच त्यांचा सुरवातीचा खेळ अत्यंत संथ असा होतो. तो जरी 'गॅलरी'ला आवडला नाहीं, तरी पण संघाला त्याची केवढी मदत होत असते! संघाला धांवा कमी पडल्या तर 'गॅलरी' कांहीं त्या आणून देणार नसते. मग तिच्या पसंतीनापसंतीसाठीं संघत्याग करावयाचा ते मूर्खपणा कसा करतील!

देवधरांचा सुरवातीचा पहिला तास दीड तासाचा खेळ हा असा नदीप्रवाहाप्रमाणें मंदवेगी असतो. त्यांची माहिती नसणाऱ्या प्रेक्षकाला वाटावें 'अरे, या कृश आणि बुटक्या माणसाला कसें फटके मारावे हें ठाऊक तरी आहे कां?' माझ्यासारखा एखाद्या चरित्रनायकाची संपूर्ण माहिती असणारा माणूस जवळ असला तर त्याला सांगतो, 'अरे बाबा याच्या मनगटांतल्या मस्तीची तुला अद्याप माहिती नाहीं, आतां त्यांचा खेळ सावधपणाचा चालला आहे याचें कारण घाईचें कारण नाहीं असेंच आहे. जरा वेळ जाऊं दे, तासाचा कांटा अजून थोडा पुढें जाऊं दे, मग त्यांचा चौरस खेळ पाहा.'

गवयाचें गाणें तंबोऱ्याची तार जमवून घेतल्याबरोबर थोडेंच तानबाजींत मैफल रंगवूं लागतें! प्रहरभर जावा लागतो, स्वरभरणी ख्यालापासून प्रथम अगदीं साध्या तालत्रितालानें करावी लागते. आणि एकदां कंठ सुटला म्हणजे मग मुर्शीतून हिरण्मयरसाची धार पडतांना मुलायम शोभा प्रतीत व्हावी, किंवा मोहोळ फुटावें आणि पडलेल्या वेजांतून डोळ्यांना उलगडणाऱ्या रेशमी रशनेसारखी मधु मधुरा धार दिसावी तशी गोड गळ्यांतून "संध्या मैं तो—" घुमूं लागते. श्रोत्यांना वर्तमानपरिस्थितीच्या, हॉलमधील

गर्दीचा, विसर पडतो, पान तंबाकूचें चांदीचें तबक डोळ्यांपुढून नाहींसें होतें. आणि स्वर्गीय तारकांचे पुंज दिसूं लागतात...

देवधरांचा पुढचा खेळसुद्धां असाच शोभिवंत होतो. सारे 'ठीकठाक' किंवा 'ब्रेतास बात' झाल्यावर निसारला ते निःसार करतील.

ग्लान्सच्या बाजूला चेंडू टोलवूं लागले म्हणजे 'फील्डर्स'ना पळतां भुई थोडी होते. आणि हा चेंडू मारतांना त्यांची हालचालही किती मनोवेधक होते. लाठीचा प्राथमिक हात शिकवितांना जशी मनगटाची पहिली फिरत होते, तशाच लवचिकतेनें त्यांचें मनगट फिरतें.

ते खेळत असले म्हणजे आपणाला सहसा झेल मिळणार नाहीं हें विरुद्ध पक्षाचे गडी ओळखून असतात. कारण, त्यांचा चेंडू सहसा उंचावरून जावयाचा नाहीं.

याच्या अगदीं उलट मेजर नायडूंचें. कधीं कधीं मला वाटतें, या आकाशांत एवढ्या चमकदार चांदण्या दिसत आहेत. मेजरनें मारलेले आजवरचे सारे चेंडू देवेंद्रानें झेलून तर हें अंबरी रंगाचें आकाश नटाविलें नाहीं? आणि हा चंद्रावरचा कलंक...चेंडू उंच टोलवतांना ज्या भागावर मेजरच्या बॅटीचा पोलादी स्पर्श झाला ती ही जखमी जागा...तो हा कलंक.

उल्कापाताचें मनोज्ञ दृश्य पाहतांना कुठल्याही क्रिकेटप्रेमी माणसाला नायडूनें उंच चढविलेला चेंडू खालीं येत असल्याची आठवण होईल.

देवधरांचा खेळ प्रारंभीं सावकाश होतो असें मीं वर म्हटलें याचा अर्थ असा करूं नका कीं त्यांना वेगवान प्रारंभ करतां येत नाहीं. बालगंधर्वांच्या हुकुमी रागिणीप्रमाणें, नटवर्य दात्यांच्या 'एव्हर रेडी' अभिनयाप्रमाणें, प्रसंगीं देवधरही धांवांची कारकीर्द पहिल्या मिनिटापासून रंगवूं लागतात. टेपवर होतांच पंचकल्याणीनें खदिरांगारासारखे झेपावत निघून फर्लांग कांपूं लागावे तसें ऐन वेळेला 'टाइम'चा प्रश्न असेल तर ते 'स्टार्ट टू फिनिश'

खेळूं शकतात. याचें उत्तम उदाहरण म्हणजे त्यांनीं एकोणिसशें अठ्ठावीस सालीं चौरंगी सामन्यांत पारशांविरुद्धच्या खेळांत केलेला तुफानवेगी विक्रम.

मुलांनो, तुम्ही त्यावेळीं कदाचित् जन्मालाही आला नसाल. तुमच्यांतील कांहीं मुलें त्यावेळीं माझ्यासारखी 'हाफ पॅंट' मधली असतील.

तो सामना फारच अटीतटीचा असा झाला. तो एकच सामना खेळून झाल्यावर देवधरांनीं बॅटीला अग्निस्पर्श दिला असतां तरी चाललें असतें.

आतां 'एक होता राजा' सारखीच सुरवात करतों.......

त्याचें असें झालें कीं......पारशीसंघाविरुद्ध हिंदूंना पहिल्या वेळेला खेळावें लागलें.

पारशी संघ त्यावेळीं चांगला मजबूत होता. हल्लींप्रमाणें 'चाले छे' प्रकारचा नव्हता. राजपुत्रांच्या हत्तींची वाटणी नीट व्हावी म्हणून शहाण्या प्रधानानें जसें स्वतःच्या हत्तीची त्यांत सरमिसळ करून योग्य व पटणारा निकाल लावला, तसेंच जवळ जवळ आजपर्यंतच्या चौरंगी सामन्यांतील हिंदु–मुसलमानेतर टीम्सबद्दल म्हणतां येईल.

मुख्य कुस्तीच्या आधीं जशा दंगलींत किरकोळ चुरशी लढविल्या जातात तशाच या टीम्स.

परंतु १९२८ सालीं जी पारशी टीम मैदानांत हिंदूंना तोंड द्यावयास उतरली ती पराक्रमी होती. पहिल्या डावांत हिंदूंपेक्षां त्यांनीं पन्नास धांवा जास्त काढल्या. दुसऱ्या डावाला मुबलक वेळ असतां तर हव्या तेवढ्या धांवा काढणारे हवे तेवढे रथी–महारथी हिंदू टीममध्यें होते. पण तसा वेळ बिलकूल नव्हता.

सारा पांच तासांचा अवधि, तेवढ्या वेळांत अडीचशें धांवा झटपट काढून पारशी संघास खेळावयास भाग पाडून सर्व गडी औट घेणें अवश्य होतें.

अगदीं पहिली अडचण ही होती कीं, थोड्या वेळांत हुकुमी धांवा कोण काढणार ? पारशांना तर स्वर्ग दोन इंचावर असल्यासारखा झाला होता.

स्लिपमधल्या वांकलेल्या फील्डरला तर असें वाटलें कीं, आपण नीट सरळ उभें राहिलों तर स्वर्गाच्या पायथ्यालाच आपलें कपाळ आपटावयाचें.

विजय आपल्या मुठींत आहे, असें त्यांच्या कप्तानानें बोलूनही दाखविलें.

आणि त्यानें तसें कां न बोलावें ? परंतु जरी त्याचें बोलणें तर्काला आणि वस्तुस्थितीवरून केलेल्या अनुमानाला धरून होतें तरी त्या कप्तानाला माहीत नव्हतें कीं......

देवधरांच्या ' जादूगार ' मनगटांत क्रिकेटक्षेत्रांतील दुनिया इकडची तिकडे करावयाचें सामर्थ्य आहे. त्यावेळचा एक लौकिकवान खेळाडू परदेशी, यांस बरोबर घेऊन देवधर पारशी गोलंदाजांना तोंड द्यावयास बाहेर पडले. वास्तविक पहिल्या जोडींत देवधर त्यापूर्वी कधीं गेले नाहींत आणि आज त्यानंतरही कधीं गेले नाहींत. त्या ' बांक्या वखताला ' पंचावन मिनिटांच्या अवधींत आपल्या सहकाऱ्यासमवेत देवधरांनीं अक्षरशः धांवाच्या गारा पाडल्या. विमानाच्या यंत्रापुढील पंख्याप्रमाणें त्यांचें बॅटीचें पातें त्या वेळीं फिरलें असेल. रथचक्र उद्धरूं पाहणाऱ्या कर्णाच्या बलशाली मनगटानें ते त्यावेळीं खेळले असतील. कारण, त्याशिवाय एकशेंचाळीस धांवा कशा निघाल्या असत्या ? तो खेळ पाहून सारे मुग्धमंत्र झाले असतील. खरेंच, ज्यांना ज्यांना तो सामना पाहावयास मिळाला ते नशिबानें धन्य असले पाहिजे. असा खेळाडू आपल्यांत आहे ही अभिमानाची गोष्ट आहे. या अभिमानावरच आपल्याला जगतां येईल. आणि म्हणूनच मी म्हणतों कीं महाराष्ट्रांत आज जी या खेळांत प्रगति झालेली दिसत आहे त्याचें सारें श्रेय ' देवधर ' या एका व्यक्तीला आहे. आणि म्हणून हातांत

बॅट, आणि कंबरेला साधा कातडी पट्टा घालून विकेटकडे मंद गतीनें जाणारी ही इवलीशी मूर्ति क्रीडाक्षेत्रांत अजरामर होऊन राहील.

२४ वस्तुतः, त्यांच्यासारख्यांचें चरित्र लिहावयाचें धाडस माझ्यासारख्यानें करावयास नको होतें. मी कांहीं 'तसा' (?) प्रसिद्ध लेखक नाहीं. अनेक मित्रांच्या साहाय्यानें जरी हें छोटेसें पुस्तक प्रसिद्ध होत असलें तरी मुख्यतः जर कोणाची मदत मला झाली असेल तर ती खुद्द देवधरांची. दोन चार वेळां या पुस्तकाच्या निमित्तानें मी त्यांच्या बंगल्यावर गेलों असतां त्यांनीं मला १९१२ पासून ते तहत आजतागायतचा इतिहास थोडक्यांत सांगितला. आणि पुनः वर सौजन्यानें मला बजावलें कीं, "नातू, तुम्ही माझें चरित्र लिहिण्याच्या भानगडींत पडतां आहांत. तुमचें सर्व कांहीं ठरलें आहे, तेव्हां मी तुम्हाला कांहीं निरुत्साही करीत नाहीं; परंतु मराठींत लिहिलेलें चरित्र खपेल असें मला वाटत नाहीं. चांगल्या ग्रंथकाराची ललित विषयांवर लिहिलेलीं पुस्तकें प्रकाशकाला तोट्यांत आलेलीं मी पाहतों." त्यानंतर मी उत्तरलों "तात्या, सूर्याला आपल्या प्रकाशाची थोडीच जाणीव असते. तसें तुमचें आहे. महाराष्ट्रांत मराठी भाषा जाणणारा जो एक मोठा वर्ग आहे, त्या वर्गांतील लाखों मंडळीला आज तुमचें चरित्र मिळालें तर वाचावयास हवें आहे. आणि असें पाहा, थोडासा तोटा आला असें धरून चला, तरी कांहीं मोठा हजार दोन हजारांचा प्रश्न नाहीं. तुम्ही माहिती पुरवा म्हणजे झालें."

त्यावर पुनः ते म्हणाले "नातू, तुमची मला भीति वाटते. तुम्ही कवि आहां, उपमा–उत्प्रेक्षा देऊन तुम्ही पुस्तकांत मला इतकें चढवून ठेवाल कीं, ती लेव्हल् आतां या वयांत मी संभाळूं शकेन किंवा नाहीं, याचें मला भय वाटतें."

यावर मीं उत्तर दिलें "परवाच तुम्ही टेनिसन् एलेव्हनबरोबर खेळ-

तांना बॅटीनें त्यांच्यांतील उत्कृष्ट गोलंदाजांनीं टाकलेल्या चेंडूंना युरोपियन जिमखान्याच्या मैदानाचा कोन अन् कोपरा साफ करावयास लावलांत. मला वाटतें, पूर्वी तुम्हीं केलेल्या अनेक पराक्रमांची मला माहिती नाहीं. त्यावेळेला माझें मन चेंडूफळीपेक्षां विटी-दांडूकडे रमलेलें असे. पण आज मला या खेळांतल्या कांहीं गोष्टी समजूं लागल्यापासून मी ऐकत, पाहत आणि वाचत आलों आहे, तेवढ्यावरून खात्रीनें सांगूं शकतों कीं, आजकालचा कोठलाही तरुण खेळाडू या खेळांतील कलेमध्यें तुमच्यापेक्षां श्रेष्ठ नाहीं. आपला आशीर्वाद द्या म्हणजे मी या पुस्तकाच्या बाबतींत यशस्वी होईन."

त्यावेळीं मी त्यांच्यासमोर बोलूं शकलों असतों तर मला कितीतरी बोलतां आलें असतें.

मी त्यांना म्हणालों असतों, तुमच्या वाढत्या वयाबद्दल तुम्हाला संकोच कां वाटतो? मुळींच वाटावयास नको. काळाची गति कुणास थांबवतां येत नाहीं. आतांच गेलेला क्षण हा पुढच्या क्षणीं भूतकाळ ठरतो. परंतु त्याची किंमत कमी होईल काय? तसें होत असतें तर आज हिमालयाचा आक्रोश पक्षाच्या चंचुसारखा स्वर्गाच्या स्वर्णरंगी तक्तपोशीला खळी मारणारी कांचनगंगा आणि धवलागिरी यांचीं नांवें आणि यांचें सौंदर्य आज नष्ट व्हावयास पाहिजे. सृष्टीच्या इतिहासाचें पहिलें पान लिहिलें गेलें तेव्हांपासून तीं तेथें आहेत.

महाराष्ट्रापेक्षां देवधरांचें कौतुक इतर प्रांतालाच फार वाटतें. याचें कारण काय बरें असेल?

मनुष्याचें अति जवळचें नातें असलें म्हणजे त्याची योग्यता कळेनाशी होते. देवधरांच्या बाबतींत अगदीं हाच अनुभव आहे. सतत तीस वर्षें क्रिकेटक्षेत्राची मनोभावें सेवा करणारे, शेंकडों मॅचेसमधून लाखों प्रेक्षकांचा हृदयस्थ देव म्हणून विराजमान झालेले, विजयश्रीनें कितीही आढेवेढे

घेतले तरी तिला कधीं कुशल गोलंदाजीच्या वशिल्यानें, तर कधीं स्वतःच्या 'फळकुटी'च्या दमदाटीनें, आपल्या गळयांत माळ घालावयाला लावणारे जे देवधर–होय–त्याच देवधरांचा चुटकीसरशी अपमान करावयास मुंबईच्या निवडसमितीस कांहींही वाटलें नाहीं. त्यावेळेला देवधरांना काय वाटलें असेल? टॅरंटकडून " The only batsman of India " अशी बहुमानाची पदवी मिळवणाऱ्या, रामजीची प्राणघातक, अमूची तुफानी, निसारची विद्युत्वेगी गोलंदाजी फोडून काढणाऱ्या देवधरांना त्या वेळेला काय वाटलें असेल? कायसरला जर्मनीचा पराभव झाल्यावर काय वाटलें असेल? सेंट हेलिना बेटांत अडकवून ठेवल्यावर जगज्जेत्या नेपोलियन बोनापार्टला काय वाटलें असेल? पानपतच्या पराभवाची वार्ता ऐकून नानासाहेब पेशव्यांना काय वाटलें असेल? सांगतां येईल तुम्हांला?— नाहीं ना? मग देवधरांच्या मनाची तरी तुम्हांला काय कल्पना येणार? ठरलेली कुस्ती मोडली म्हणजे मनाला किती उद्वेग व संताप येतो हें खऱ्या पहिलवानाशिवाय कुणाला कळणार? गाणें अगदीं ऐन रंगांत आलें असतांना एकदम जर तंबोऱ्याच्या तारा तुटल्या तर किती बेरंग होतो हें गवयाखेरीज कोण सांगूं शकणार? परीक्षेचा संपूर्ण अभ्यास झाल्यानंतर ऐन परीक्षेंत आजारी पडल्यावर मनाला कशा प्रकारच्या वेदना होतात हें अभ्यासू विद्यार्थ्याखेरीज कोण सांगूं शकणार? ज्या दिवशीं मी ती बातमी 'नभोवाणी'वरून ऐकली त्या दिवशींच नाहीं तर पुढें कित्येक दिवस मी कितीतरी बेचैन झालों होतों!

२५ देवधरांच्या खेळांत तडफ नाहीं म्हणून नाक मुरडणारे टीकाकार पाहिले म्हणजे मला हंसूंच येतें. वालचंद हिराचंद शिकलेला नाहीं म्हणून कां तुम्ही त्याला हंसणार?—यशःप्राप्तीच्या मार्गापेक्षां अंतिम यशाकडे नको कां पाहायला?—आणि शिवाय मी म्हणतों, वेळ पडली तेव्हां देवधर देखील

आपल्या 'फळकुटाची' तडफ दाखविल्याखेरीज राहिले आहेत काय ? १९२८ सालीं पारशांविरुद्ध आणीबाणीच्या वेळीं बिनबाद राहून अवघ्या पंचावन मिनिटांच्या अल्पावधींत काढलेल्या १४० धांवा देवधरांच्या द्वेष्ट्यांनाहि विसरतां येणें, मला वाटतें, अशक्य आहे.

आणि मी म्हणतों, बॅटिंगबद्दलची तडफ जी तुम्ही म्हणतां ती म्हणजे काय असा एकमेव गुण आहे कीं, जो नसला म्हणजे बॅटस्‌मन्‌च्या बाकीच्या सर्व गुणांकडे आपण दुर्लक्ष करावें ?—मोटार वेगांत जातांना पाहून जितका आनंद होतो त्याच्या कितीतरी पटींनीं तिच्या पुढील संभवनीय अधःपाताची कल्पना आली म्हणजे मनाला दुःख होतें. मी म्हणतों, वाहन थोडें हळूं नेलें म्हणून काय झालें ?—तें इष्ट स्थळीं सुखरूप गेलें म्हणजे झालें !—अनिश्चितपणें शेंकडों इंच पडणाऱ्या पावसापेक्षां थोडा पण नियमानें पडणारा पाऊस शहाण्या शेतकऱ्याला हवासा वाटतो. देवधरांना दिवाळींतले भुईनळे उडवायचे नाहींत ! ते खरे कप्तान आहेत. बोट पैलतीराला यशस्वी रीतीनें नेणें हेंच त्यांचें ध्येय ! या उच्च ध्येयाकडे दुर्लक्ष करून ते जर खोट्या लोकप्रियतेच्या पाठीमागें लागले तर मृगजलामागें धांवणाऱ्या हरणासारखी नाहीं कां त्यांची स्थिति होणार ?

देवधरांच्या अंगांतली सगळी चपलता ते धांवा काढतांना ज्या हरिणगतीनें धांवतात त्यावरून व एखाद्या जादूगाराच्या रहस्यमय पद्धतीनें झेल झेलण्याच्या त्यांच्या पद्धतीवरून दृग्गोचर होते. धांवा काढतांना जें पळावयाचें असतें त्यांत गतीपेक्षां केव्हां व कसें धांवावयाचें, आपल्या सहकाऱ्याला खुणावून त्याचा बचाव कसा करावयाचा हें पाहणें अधिक अगत्याचें असतें. विमानविरोधी तोफांना ज्याप्रमाणें आपलें लक्ष्य कितपत वेगानें धावत आहे, तें किती उंचीवर आहे वगैरे गोष्टींचा विचार करणें आवश्यक असतें, त्याप्रमाणें धांवा काढतांना, पळणाराला देखील चेंडू

कितपत जोरानें सुटला आहे, कोणी त्याला अडवीत आहे काय, आपला सहकारी आपणावर आदळत नाहीं ना वगैरे अनेक गोष्टींचा विचार करावयाचा असतो. हें ज्याला जमत नाहीं तो अर्थात् 'रन आऊट' हा दुर्दैवी शिक्का कपाळावर मारून घेतो. देवधर कधीं 'रन आऊट' गेल्याचें माझ्या तरी ऐकिवांत नाहीं.

देवधरांचा दुसरा महत्त्वाचा गुण म्हणजे झेल झेलण्याची त्यांची कला. 'सुंदर झेल झेलावेत तर ते देवधरांनींच' असाच त्यांचा गौरव त्यांचे टीकाकार देखील करतात. भगवान् शंकरानें ज्या अचुकतेनें स्वर्गातून कोसळलेल्या गंगेला आपल्या डोक्यावर झेलले त्याच—अगदीं त्याच अचुकतेनें देवधर उंचावरून येणाऱ्या चेंडूला आपल्या पंज्यांत झेलतात. झेल अति उंचावरून येणारा असो, भुई समांतर वेगानें येणारा असो, किंवा विकेटच्या अगदीं जवळ पडलेला असो. देवधरांच्या हातून त्याची सुटका होणें कठीण. एका प्रसिद्ध इंग्लिश खेळाडूनें देवधरांच्या या झेल झेलण्याच्या अप्रतिम कौशल्याकडे पाहून म्हटलें देखील होतें, "Mr. Devdhar, you catch balls like flies." देवधरांच्या स्वभावांतील सहानुभूतीमुळें पुष्कळदा ते इतरांच्या अंगावरचे झेल देखील झेलून दाखवतात. अर्जुनाच्या मनाला झालेली भ्रांति पाहून भगवान् श्रीकृष्ण ज्याप्रमाणें हातांत सुदर्शन घेऊन धांवतो त्याप्रमाणें देवधर इतरांची 'भ्रांति' पाहून त्यांच्या अंगावर आलेले झेल झेलतात. कांहीं मद्रासच्या प्रसिद्ध सामन्यांत मेजर नायडू यांच्या गुडघ्यावर चेंडू आपटून उडाला. सगळ्यांना वाटलें—अरेरे ! एवढा सुंदर झेल व्यर्थ गेला, पण तेवढ्यांत देवधर चित्त्याच्या चपळाईनें पुढें झाले आणि त्यांनीं तो चेंडू भूमातेचा आश्रय करण्यापूर्वी दोन सेकंद आधीं उचलला. देवधर इतके सुंदर झेल कां

झेलूं शकतात ?–उत्तर स्पष्ट आहे !–चेंडूवर सारखी स्थिर असलेली त्यांची गरुडदृष्टि, चेंडू कुठें व कसा पडणार याचें अचूक निदान करण्याची शक्ति असलेली त्यांची हिशेबी वृत्ति, अंगाची बेसुमार चपळाई व वेळ पडली तर जिवाची पर्वा देखील न करतां झेल झेलण्याबद्दल असलेली मनांतील उत्सुकता– ह्या इतक्या गोष्टी ज्यांच्या अंगीं आहेत, ते देवधर उत्तम झेल कां बरें झेलूं शकणार नाहींत ? नुकत्याच झालेल्या मुंबईच्या सामन्यांत एक अत्यंत वेगांत असलेला चेंडू–हात फुटला तरी देवधरांनीं कसा झेलला याची आठवण वाचकांना करून दिली म्हणजे मला वाटतें, देवधरांच्या झेल झेलण्याच्या या कौशल्याबद्दल मी अधिक बोलण्याची आवश्यकता उरणारच नाहीं.

२६ गेल्या चाळीस सालांत अनेक खेळाडू जन्माला आले, शाळा–कॉलेजच्या–क्वचित् चौरंगी–पंचरंगी सामन्यांत 'जरासे चमकले आणि मावळले...

परंतु देवधर ? एखाद्या ऐरावताप्रमाणें लोकप्रियतेचें रान तुडवीत पुढें जात आहेत. वादळांतून जातांना 'क्वीन मेरी' मचव्याप्रमाणें कांहीं कावरीबावरी होत नाहीं. कधीं 'टक्का', कधीं 'धक्का' घेत, ते धीरानें पुढें चालले आहेत.

...खरेंच, ग्रेसचा खेळ पाहिल्यानंतर हिंदुस्थानांत तसा खेळाडू जन्माला यावा म्हणून सर्वांनीं परमेश्वराची करुणा भाकली असली पाहिजे आणि मग प्रसन्न झालेल्या पुरुषोत्तमानें हा 'दिनकर' प्रकाशित केला.

त्यांची 'आठवण' महाराष्ट्र उदंड वर्षें ठेवील.

त्यांच्या खेळासाठीं सारें शहर जिमखान्याकडे अनेकवार खेंचलें गेलें आहे. 'लकडीपुला' वरून पुराणकाळीं आत्मे गेले. परंतु देवधरांनीं 'क्रीडासुखा'चे वैकुंठ अनेक रसिकांना 'सदेह'पणें दाखविलें. त्यांच्या

खेळाची स्मृति म्हणजे अरेबियन नाइटसारखी मधु मधुरा आहे. त्यांची 'बॅट' म्हणजे जादूचा दिवा! देवधरांच्या 'रौप्य ज्युबिली'चा समारंभ महाराष्ट्राकडून थाटानें साजरा होईल. त्यावेळीं पुण्याच्या म्युनिसिपालिटीला माझी एक प्रेमाची सूचना आहे. आजपर्यंत अनेक रस्त्यांना आवडत्या लेंकरांचीं नांवें देऊन तिनें त्या त्या 'गुणी' जनांचें कौतुक केलें आहे. देवधरांचा अभिमान पुण्याला आहे—महाराष्ट्राला आहे. हिंदुस्थानाला आहे. उद्यांचा महाराष्ट्र त्यांच्या नांवानें मुंबईसारखें 'स्टेडियम' बांधील.

तें व्हावयाचें तेव्हां होवो.

परंतु आज...ज्या पुलाला 'लकडी' पूल म्हणून संबोधिलें जातें त्याचें नांव यापुढें 'देवधर पूल' म्हणून ठेवण्यांत यावें.

पुण्यांत धनवंताचें कौतुक आजवर म्युनसिपालिटीनें केलें.

—आतां तिनें हें 'कले'चें कौतुक उदार मनानें करावें. 'देवधर' ब्रिजवरून जातांना मुलांना—तरुणांना अभिमान वाटेल. आणि 'पोक्तां'ना काय खेद वाटेल? छे छे, ते उलट जास्त सहर्ष होतील. ते म्हणतील 'अरे आपल्यांतील एकाचें हें खरें कौतुक झालें.'

माझ्या या सूचनेचा सर्वांनीं अवश्य विचार करावा.

वृत्तपत्रांनीं या विषयाला चालना द्यावी.

२७. या एवढयाशा 'चोपड्यां'त देवधरांचे सर्व गुण साकल्यानें मला वर्णन करतां येणें शक्य नाहीं. हें फक्त 'मंथन' आहे. हा भटांनीं काढलेला सुंदर पोर्ट्रेट नव्हे, हा 'अमॅच्युअर'नें घेतलेला 'बेबी कोडॅक'चा स्नॅप आहे. यांत 'निगेटिव्ह' नीट निघाली नसेल; यांत 'लाइट इफेक्ट' साधला नसेल. यांत 'देवधरांची आकृतीही अस्पष्ट' आली असेल; पण यामुळें 'चरित्रविषय' विद्रूप होण्याची मुळींच भीति नाहीं. मध कांचेच्या बाटलींत

भरला म्हणून त्याचे गुण कमी थोडेच होतात? हिरकणीची मुद्रिका शिद्यानें बोटांत घातली म्हणून काय चमकणार नाहीं?

देवधरांच्या खेळाचें–कष्टाचें–यशाचें अनुकरण करून महाराष्ट्रीय तरुणांनीं पुढें सरलें पाहिजे. 'अहीमहीं'च्या रक्ताच्या थेंबागणिक अनेक अहीमही उत्पन्न झाले, तसें देवधरांच्या गुणसंकर्पांतून उद्यांच्या तरुण पिढींत भांडारकर, रांगणेकर, मोहोनी, सोहनी, हजारे हॅरिस, यांसारखें 'बलवान् वज्रबाहू' निर्माण झाले पाहिजेत.

'रणजी ट्रॉफी' मग पुण्याला स्थायिक होऊन राहील.

...आतां या शेवटच्या ओळी लिहितांना मनाला एक गोड कर्तव्य पार पाडल्याचें समाधान वाटत आहे.

हें पुस्तक लिहावयाचा संकल्प मी फार दिवसांपूर्वीं सोडला होता.

त्यावेळीं कांहीं असें होतेंच कीं जे म्हणाले......

"अहो, आतां कशाला तें लिहितां? त्यांची बॅट थकली आतां."

मी म्हणालों "छे छे, मला तसें मुळींच वाटत नाहीं."

त्यावर दुसरे गरजले "अहो, किर्लोस्करमधला लेख वाचा, त्यांतसुद्धां म्हटलें आहे कीं वाढत्या वयोमानाबरोबर तीक्ष्ण नजरेच्या कमतरतेमुळें यापुढें फार वर्षें देवधर क्रिकेट खेळू शकत नाहींत हें निश्चित. मग आतां बोला काय म्हणतां तें?"

"मीं पुस्तक लिहावयाचा निश्चय केला आहे; तो आतां बदलणें शक्य नाहीं; मागें 'ब्रॅडमन' चरित्र लिहिलें तेव्हां कोणी म्हणाले, त्यापेक्षां कादंबरी लिहिली तर जास्त खपेल." मी उत्तर दिलें.

त्यावर ते कुरकुरले "लिहिणारच म्हणतां तर लिहा. पण पांच दहा कॉपीज् खपल्यावर नशीब समजा!

मला त्यांचें हें म्हणणें मुळींच पटलें नाहीं.

खपावर आणि प्रसिद्धीवर सारें जग चाललें असलें तर......

२८. मला लिहितां आलें तसें मीं लिहिलें. मुलांनो, मानारच्या आखातांचे सारेच मोती पाणबुड्याच्या हातीं थोडेच लागतात ? 'देवधरां'च्याबद्दल वाटणारें सारें कौतुक कांहीं 'कागदां'त गुंडाळून मला छापखान्याकडे पाठवितां आलें नाहीं आणि तें शक्य होणार नाहीं. खरे मनोभाव हे मनुष्य स्पर्शातीत ठेविला ठेवतो. हातांतील 'पेन' खालीं ठेवीन आणि जिमखान्याची वाट चालूं लागेन.

तिथें...

अनेक उन्हाळे पावसाळे पाहिलेली...लक्षावधि प्रेक्षकांना देहमान हरपावयास लाविलेली...पुण्याचें नांव महाराष्ट्रांत-महाराष्ट्राचें नांव हिंदुस्थानांत —आणि हिंदुस्थानचें नांव विलायतेंत पोंचविणारी...

एक 'किरकोळ' व्यक्ति उभी असेल. जिमखान्याच्या व्हराड्याच्या पायऱ्या उतरून ते खालीं येतील. आपले धारदार ओंठ अलविलग करीत आपल्या किरमिजी नजरेची नेटकी टक माझ्याकडे टाकीत ते कांहीं बोलूं लागतील.

"तात्या, चरित्र छापावयास घेतलें बरें कां."

ज्या वृक्षावर लाल फुलें फुलतात आणि ज्याच्याखालीं श्रांत खेळाडूंना बसावयासाठीं 'लोहासनें' ठेविलीं आहेत, त्यांपैकीं एकावर स्वतः बसत व मला बसवून घेतील ते आश्चर्यचकित होऊन म्हणतील "म्हणजे हें काय ! अहो, मला कळवून तरी छापावयास घ्यावयाचें ! "

"कदाचित् तुम्ही तें प्रसिद्ध करून दिलें नसतेंत. मागें मी तुम्हाला कांहीं मजकूर वाचावयाला पाठविला तेव्हां संकोचानें 'हें कशाला ?' 'इथें फार कौतुक होतं' वगैरे प्रेमळ 'तक्रारी' तुम्हीं केल्या. म्हणून ठरविलें कीं छापून झाल्यावर तुम्हाला कळवावयाचें."

या माझ्या म्हणण्यावर थोडें मोकळें हंसणें होईल.

हास्याची खसखस काळक्षणाच्या दर्यांत विरून गेल्यानंतर अस्ताला चाललेल्या सूर्याकडे बोट दाखवून मी त्यांना म्हणेन– " कांहीं वर्षांपूर्वी तुमचें असेंच झालें होतें. हा 'दिनकर' कांहीं काळ 'दृष्टी'च्या टप्प्यापलीकडे होता, म्हणून लोकांना वाटलें आतां हा कायमचा अस्तंगत झाला. परंतु...
" काय ? परंतु काय ?"

" परंतु 'दिनकर' पुन्हां उमाठ्यावर आला. त्यावेळीं अवघ्या द्विज-गणांनीं त्याच्या प्रबोधनासाठीं भूपाळी म्हटली. रागावलेल्या 'म्हातारी'नें टोपलें भिरकाविलें. त्यांत कोंडून पडलेली 'कुक्कुट'मालाही बाहेर पडली आणि 'दिनकर फिरून प्रकाशित झाल्याची वर्दी जगाला देऊं लागली."

"या रूपकांतली म्हातारी कोण ?" त्याच्याकडून हा प्रश्न विचारिला जाईल.

आणि मग... ?

' शुभ रात्र ' म्हणून घराकडे परत पावलें वळतील.

आणि ' देवघर ' पुलावरून पलीकडे दिसणाऱ्या भव्य आणि गंभीर ' तिन्हीसांजे'कडे डोळे वेधले जातील.

...या पुलावरून फार पूर्वी मी प्रथम माझ्या मामाच्या घरीं गेलों.

आणि आज फार वर्षांनंतर त्या पुलाला 'नांवें' ठेवीत ठेवीत मी 'तात्यां'-च्या घराकडून परत फिरत आहे. डाव्या हाताला पूलकमानींतून मंदाकिनीचा रुपेरी वरख संगमाच्या बाजूला दूर दूर अदृश्य होत चाललेला दिसत आहे. कडेच्या सांबाच्या देवळांच्या शिखरावर : विसाव्यासाठीं वैनतेयाची दुकल बसलेली दिसत आहे. चंद्र माथ्यावर टळलेला आहे. मैदानांवरून खेळून घराकडे परत चाललेलीं दोन चार छोटीं मुलें माझ्या पुढेंच बोलत चाललीं आहेत.

" उद्यां मी देवघरासारखे फटके मारणार!" एक, 'हाफ पँट', दुसऱ्या ' चड्डी 'ला म्हणाली.

'—आणि मी हजारेसारखी सिक्सर मारणार ! एका नुसत्या 'लंगोटी' नें उत्तर दिलें.

त्या ' तीन दत्तात्रया 'कडे पाहून मला कौतुक वाटलें.

ती अगदीं गरिबांची लेकरें होतीं.

मी मनाशीं समाधानानें हंसलों. आणि म्हणालों, माझ्यासमोर चाललेलीं हीं तीन मुलें म्हणजे उद्यांचे ' नायडू, देवधर, निसार आहेत.'

—पावलें झपाट्यानें पडत होतीं. अर्धाअधिक पूल ओलांडलाही होता. इतक्यांत पैलतीराला नदीकिनाऱ्यावर आसावलेल्या तापलेल्या वाळूकणावर एक–दोन–तीन असे प्रकाशपुंज दिसले.

माझी दृष्टि मी चटकन् तेथून काढून घेतली. परंतु पावसानें अंग भिजून गेल्यानंतर छत्रीचा उपयोग काय ?

मला ' अमरसिंगा 'ची स्मृति झाली आणि मी कासावीस झालें.

पुलाच्या लोखंडी बाजवा संपल्या. मी चौकांत येऊन पोंचलों.

' रेस्टॉरंट 'च्या रेडीओंतून गोहरच्या गोड गळयांतून घुमलेला गज्जल माझ्या कानांवर पडला.

क्षणजीवी जीवनी ऽ ऽ ऽ

गेऽ ज्षा येइ निशा ऽ ऽ ऽ

REFBK-0005968

मराठी ग्रंथ संग्रहालय ... सं. ... ठाणे.
मराठी ... ५९६८ ... ठाणे

श्रीयुत गुंडी यांचें

# श्रीनिवास विश्रांति-गृह

स्वच्छतेचें माहेरघर म्हणून पुण्यांत
पुष्कळ वर्षांपासून लोकप्रिय
असलेलें

जोगेश्वरी नाका, पुणें २.

# पूना रेडिओ सेंटर.

येथें सर्व प्रकारचे रेडिओ रिपेअर केले जातात. तसेंच नवे रेडिओ कोठल्याहि इंग्लिश अगर अमेरिकन मेकचे आम्ही देऊं शकतों. सेकंडहँड रेडिओ स्वस्त दरांत एक वर्षाच्या गॅरंटीसह आमच्याकडे मिळतात.

१६६१ शुक्रवार पेठ, पुणें २.

पुण्यांतील सुप्रसिद्ध

# सुगंधी मालाचे कारखानदार

## दामोदरदास भगवानदास

## सुगंधी

रविवार पेठ,

पुणें २.

## कव्हरवरील फोटो
## के. बी. गोडबोले, फोटो आर्टिस्ट,
## यांनीं घेतलेला आहे.

## नवजीवन प्रोसेस स्टुडिओमध्येंच

आपले ब्लॉक्स् तयार करून घ्या.

वेळेवर व उत्कृष्ट काम करून मिळेल.

गोखले हॉलसमोर,

लक्ष्मीरोड, पुणें २.

भारत-प्रकाश-ग्रंथमाला, पुष्प ३ रें.

## सेनापति तात्या टोपे

द्वितीय आवृत्ति. किंमत १२ आणे.

लेखक— डॉ. ना. दा. सावरकर.

पत्ता —श्री. द. वैद्य, २९२ शनवार, पुणें २.

◀ स्त्रीजीवन ▶

कन्या—पत्नी—माता

ह्या त्रिविध अवस्था

उत्कट रीतीनें दर्शविणारा

'ग्रेट इंडिया पिक्चर्स'चा सामाजिक बोलपट

# स्नेहबंधन

— मुख्य कामें —

सर्वांची आवडती नटी बिब्बो

ई. बिलिमोरिया, नवीन याज्ञिक, मुन्नामिल, प्रतिमादेवी वगैरे.

डायरेक्टर :

जे. पी. अडवानी.

श्री. किकुभाई देसाई ह्यांच्या खास देखरेखीखालीं

तयार झालेला

लवकरच

पॅरेमाऊंट टॉकीजमध्यें पहा.

दि कार्बो प्रॉडक्टस् यांच्या

# रेडियम बॅटरीज

जास्तींत जास्त वेळ प्रकाश देतील.

**दी कार्बो प्रॉडक्टस्**, शिवाजी रोड, पुणें २.

---

तरुणांचे अत्यंत आवडते नायक—दिग्दर्शक **विनायक** यांची
अप्रतिम विनोदी कलाकृति—

**नवयुग चित्रपट** लि. कृत

# लग्न पहावें करून

**मुंबई—न्यू वेस्ट एन्ड : पुणें—मिनर्व्हा**

येथें धडाक्यानें चालू आहे.

मुख्य भूमिकाः—**दामूअण्णा मालवणकर**

---

याचे पाठोपाठ येणारे 'नवयुग'चे दोन अत्यंत प्रेक्षणीय बोलपट

**१ अमृत** — **२ संगम**

दिग्दर्शक—**विनायक**

लेखक—**वि. स. खाण्डेकर**

भूमिकाः—विनायक, मिनाक्षी, ललिता पवार, मा. विठ्ठल, बाबूराव पेंढारकर, मालवणकर इ. इ.

भूमिकाः-? ?

# साठे बंधु यांचीं

सुप्रसिद्ध

स्ट्रॉबेरी व माल्टेक्स

# बिस्किटें

रुचकर व स्वादिष्ट असतात.

---

पहिलाच 'स्वदेशी' कोको

साठे बंधु यांचा

# गोल्डन कोको

प्रातरुपाहाराकरितां वापरा व ताजेतवानें होऊन

दिवसभर काम करा.

तुमच्या नेहमींच्या व्यापाऱ्याकडे मिळेल.

अगर लिहाः—

साठे बंधु, पुणें शहर.